रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २६३
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
मोरा-मुंबई रो-रोच्या कामाला वेग/३
डम्पर बंद पडल्याने बोरघाटात वाहतूक कोंडी/५
ऑलिम्पिकमध्ये १२८ वर्षांनी क्रिकेटचा समावेश/८

## महाराष्ट्र शासन राबविणार ई-मंत्रिमंडळ उपक्रम




**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून व डिजिटल इंडिया अभियानाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने नागरिक सेवा अधिक प्रभावीपणे डिजिटल स्वरूपात पुरवण्याचा संकल्प केला आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल, अशी माहिती राज्य शासनामार्फत देण्यात आली आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळ बैठकीचे नियोजन, संदर्भ शोधणे, निर्णयांची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने कार्यपद्धतींचे परीक्षण अधिक सोप्या पद्धतीने करता येणार आहे.

# आदिवासींच्या पुनर्वसनासाठी आता मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

### घरांसंदर्भात धोरणात्मक आणि सकारात्मक निर्णय नक्कीच होईल -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**आदिवासींच्या पुनर्वसनासाठी सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पनवेल, उरण तालुक्यातील सिडको परिक्षेत्रातील आदिवासी बांधवांच्या घरांसंदर्भात धोरणात्मक आणि सकारात्मक निर्णय नक्कीच होईल आणि यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लवकरच भेट घेणार असल्याची प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.**

ते म्हणाले की, करंजाडेजवळील वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये ही फणसवाडी नावाची ही आदिवासींची वसाहत आहे. सिडकोच्या जागेवर असलेली फणसवाडीमध्ये ३२ घरे होती. रेल्वेला जो डक्ट बनवलेला आहे. कॉलेजकडे किंवा विमानतळाच्या पुनर्वसनाच्या वसाहतीकडे जाणारा जो मार्ग आहे तो रस्त्यावरचा क्रॉसिंग रोड बंद करून डक्टमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्या रस्त्यातील १२ घरे त्यांना काढायची होती, पण त्यांना पुनर्वसनाचा कुठलाही आधार न देता आणि आश्वासन न देता ती घरे निष्कासित करण्याचा सिडकोचा प्रयत्न होता. जवळपास गेल्या दोन महिन्यांमध्ये सिडको प्रशासन डेडिकेटेड फ्लाईट कॉरिडॉरच्या आढाव्यामुळे, पंतप्रधान कार्यालयाकडून होणारा आढावा, मुख्य सचिवांकडून मिळणारी ताकीद त्यामुळे सिडको त्यांना पुनर्वसन न करता बेघर करण्याचा प्रयत्न करत होते. (पान २ वर..)

> करंजाडेजवळील आणि वडघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील फणसवाडी येथील बेघर झालेल्या आदिवासी बांधवांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून त्या वाडीच्या मागील बाजूस घरे बांधून देण्यात येणार आहेत. अवघ्या काही दिवसांत ही घरे बांधून तयार होतील. प्रत्येकाला ३०० स्केअर फुटाची घरे बांधून देणार आहेत आणि तशी तातडीने कार्यवाही होणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून पनवेल, उरणमधील सिडको हद्दीतील आदिवासी बांधवांच्या घरासंदर्भात एक चांगला निर्णयही होईल.
>
> **-दर्शना भोईर,** माजी नगरसेविका

> *आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्यामुळे येथील आदिवासी बांधवांच्या घरांबाबत धोरणात्मक निर्णय होणार आहे. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार आहेत. सध्यस्थितीत १२ घरांच्या निवाऱ्यासाठी या ठिकाणी बाजूच्या जागेत घरे बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे येत्या दहा-पंधरा दिवसांत काम पूर्ण होईल आणि या बेघर झालेल्या १२ कुटुंबांची घरांची सोय होणार आहे.*
>
> **-मंगेश शेलार,** सरपंच, करंजाडे

## मुंबई-गोवा महामार्ग उद्या अवजड वाहनांसाठी बंद

### शिवपुण्यतिथी कार्यक्रमासाठी प्रशासनाची खबरदारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**


मुंबई-गोवा महामार्गावरील शनिवारी (दि.१२) खारपाडा ते कशेडीपर्यंतचा रस्ता हा अवजड वाहनांसाठी बंद असणार आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह हे त्या दिवशी रायगडला येणार असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ही माहिती दिली.

रायगड किल्ला येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची ३४५वी पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम दि. १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आह. या कार्यक्रमाकरीता नागरिक हे आपआपली वाहने घेवून हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या काळात अपघात व वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडी पर्यत जड-अवजड वाहनांमुळे जागोजागी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ००.०१ ते दुपारी १५.०० वाजेपर्यत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडी पर्यत जड-अवजड वाहनांस वाहतूक बंदी करण्याची अधिसूचनेद्वारे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पारित केले आहेत. (पान २ वर..)

## मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाला भारतात आणले

### एनआयए मुख्यालयात चौकशी होणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं आहे. एनआयएचे आयजी बत्रांच्या नेतृत्वात विशेष पथक राणाला घेऊन भारतात आलं आहे. आता तहव्वूर राणाची एनआयए मुख्यालयात चौकशी होणार आहे. मुंबई हल्ल्याच्या कटात सहभागी असलेल्या तहव्वूर राणाला २००९ साली अमेरिकेत अटक करण्यात आली होती. आता त्याला भारतात आणण्यात आलं आहे. मुंबईमध्ये २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी तहव्वूर राणाला अमेरिकेत अटक करण्यात आली होती. या हल्ल्यात १६० हून अधिक लोक मारले गेले होते. प्रेषित मुहम्मदचे वादग्रस्त व्यंगचित्र प्रकाशित करणाऱ्या जिलँड्स-पोस्टेनवरील हल्ल्याच्या प्रयत्नाशीही त्याचा संबंध होता. राणावर १२ गुन्ह्यांचा आरोप होता, ज्यामध्ये अमेरिकन नागरिकांच्या हत्येला मदत करणे आणि प्रोत्साहन देणे यांचा समावेश होता.

## कोळवाडी गावात विविध विकासकामांचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत कोळवाडी गावात मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांची यशस्वी पूर्तता झाली आहे. या कामांमध्ये अंतर्गत गटार आणि रस्त्याचे काँक्रीटीकरणाचा समावेश असून यासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या पूर्ण झालेल्या विकासकामांचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१०) झाले.

कोळवाडी गावातील अंतर्गत रस्ते आणि गटारांची दुरवस्था झाली होती. त्यामुळे ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी गावकऱ्यांच्या या अडचणींची दखल घेत जिल्हा वार्षिक योजनेतून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतून गावात दर्जेदार अंतर्गत गटार आणि रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळ्यावेळी अरुणशेठ भगत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कामाचे कौतुक केले. तसेच आमदार प्रशांत ठाकूर नेहमीच आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्यांसाठी तत्पर असतात. कोळवाडीतील ही विकासकामे त्यांच्या प्रयत्नांचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगून भाजप नेहमीच विकासकामांना प्राधान्य देतो. त्यामुळे आगामी काळातही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या (पान २ वर..)

## महाराष्ट्र तापला !

### तापमानाची वाटचाल पन्नाशीकडे

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र सध्या प्रचंड तापलाय. तापमानाचा उद्रेक होत असून आता कमाल तापमान पन्नाशीकडे झेप घेत असल्याचे चित्र आहे. गुरुवारी बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ४० अंशांच्या वर गेलं आहे. हवामान विभागाच्या विशेष तापमान अंदाजानुसार, नंदूरबारमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.३ अंशांवर स्थिरावला आहे. जळगाव, अकोल्यात ४३.७ अंशांची नोंद झाली आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचा दाह वाढला आहे.

दरम्यान, विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात प्रचंड उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे. महाराष्ट्रात सध्या विदर्भ वगळता उर्वरित संपूर्ण राज्यात तापमानाचा उच्चांक झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भात पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय.

बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचा पट्टा तयार होत असून, तामिळनाडूच्या दक्षिणेपर्यंत त्याचा परिणाम दिसत आहे. त्यातच राजस्थानपासून विदर्भाच्या वायव्येपर्यंतसुद्धा कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्यानं याच प्रणालीच्या परिणामस्वरुप राज्यावर पावसाचे ढग घोंगावताना दिसत आहेत.

## निवडक

### सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**नाशिक :** सप्तश्रृंगी गडावर भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे गुरुवारी चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. बुधवारी रात्रीपासूनच सप्तश्रृंगीगडावर भाविकांचे लोंढेच्या लोंढे पोहोचले. गुरुवार पहाटे पाच वाजेनंतर भाविकांच्या संख्येत अचानक मोठी वाढ झाली. बॅरिकेड्स तुटले आणि ही चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे मंदिर प्रशासनावर ताण निर्माण झाला.

### कटरा ते श्रीनगर धावणार वंदे भारत एक्सप्रेस

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात वेगवान वंदे भारत एक्सप्रेस आता जम्मू-काश्मीरच्या डोंगराळ भागातही धावणार आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाअंतर्गत ही सेवा सुरू केली जात आहे. यामुळे कटरा ते श्रीनगर फक्त तीन तासांत पार करता येणार आहे. या ट्रेन सेवेचे उद्घाटन १९ एप्रिल २०२५ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर बुकिंगसुद्धा सुरू होणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी दिली आहे.

## भगवान महावीर जयंतीनिमित्त शोभायात्रा



### जैन धर्मीयांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण देशात भगवान महावीर स्वामी जयंती मोठ्या श्रद्धेने गुरुवारी (दि.१०) साजरी झाली. या पवित्र दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी जैन समाजातील बांधवांना शुभेच्छा दिल्या. अहिंसा परमो धर्म: आणि जिओ और जिने दो या तत्वज्ञानाचा अवलंब करत जगाला समता, करुणा व शांततेचा संदेश देणारे भगवान महावीर यांचे विचार आजही तितकेच मार्गदर्शक ठरत आहेत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले.

भगवान महावीर जयंतीनिमित्त पनवेलमध्ये सकल जैन समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सहभाग घेतला आणि नागरिकांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी नगरसेवक राजू सोनी, भाजप जैन सेल कोकण विभाग प्रमुख आणि पनवेल व्यापार आणि उद्योग आघाडी समन्वयक विनोद वाफना (पान २ वर..)

## मुंबई-पुणे प्रवास आणखी जलद!



### दोन रेल्वे प्रकल्प तयार होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे प्रवास आता आणखी जलद होणार आहे. रेल्वे लवकरच दोन सविस्तर प्रकल्पाची आखणी करणार आहे. कर्जत ते लोणावळ्यादरम्यान दोन सविस्तर प्रकल्प अहवाल मध्य रेल्वेने तयार केले असून ते रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आले आहेत. मंजुरी मिळाल्यानंतर या प्रकल्पाचे काम सुरू होणार आहे.

मुंबईवरून पुण्याला जाणारा सर्वाधिक वाहतूक असलेला हा मार्ग आहे. हा मार्ग झाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. पनवेलमध्ये देशातील सर्वात मोठे विमानतळ होत आहे. त्यामुळे कर्जत ते लोणावळा मार्गिका प्रवाशांसाठी खूप फायदेशीर ठरू शकते. कर्जत-लोणावळा भागातील मार्गासाठी दोन प्रस्ताव तयार केले आहेत.

नवीन मार्गावर चढ-उतार नसल्याने रेल्वेला अतिरिक्त बँकर इंजिन जोडण्याची गरज भासणार नाही. तसेच या प्रकल्पात भुयारी मार्ग आणि पुलांचा समावेश असणार आहे. एकेरी बोगदे असून त्यातून दोन्ही मार्गिका जातील तर काही ठिकाणी दोन्ही मार्गिकांसाठी स्वतंत्र बोगदे असतील.

### नाशिक-मुंबईही नवीन रेल्वे लाईन होणार

**नाशिक :** नाशिक ते मुंबई रेल्वे प्रवास आणखी जलद होणार आहे. नाशिक -मुंबई रेल्वेमार्गावर समांतर रेल्वे लाईन टाकली जाणार आहे. कसारा घाट ते मनमाड दरम्यान नवीन रेल्वे लाईन उभारली जाणार आहे. नवीन रेल्वेमार्गावर नवीन नाशिकरोड, नवीन पाडळी, वैतरणानगर, चिंचलखैरे ही चार नवीन स्थानके बांधली जाणार आहेत.


## जेजुरी गडाला राज्यस्तरीय संरक्षित स्मारकाचा दर्जा

**पुणे : प्रतिनिधी**



शासनाच्या पुरातत्व खात्याने महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीच्या खंडोबा मंदिर व गडकोटाला राज्यस्तरीय संरक्षित स्मारकाचा दर्जा घोषित केला आहे, अशी माहिती श्री मार्तंड देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाने दिली.

महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर केला असून, यासाठी ३४९ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. यापैकी सुमारे १०९ कोटी रुपयांची विकासकामे पहिल्या टप्प्यात सुरू आहेत. जेजुरी गडकोट हे संपूर्ण राज्यस्तरावर राज्य संरक्षित स्मारक म्हणून शासन निर्णयानुसार २४ ऑक्टोबर २००२ रोजी राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्यात आलेले आहे. याचे अधिकृत पत्र महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रालय संचालनालय विभागीय कार्यालय पुणेचे संचालक डॉ. विलास वाहने यांनी श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरीच्या विश्वस्त मंडळाला दिले आहे.



# एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार प्रताप सरनाईक यांच्यावर एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची नियुक्ती एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर केली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा निर्णय मागे घेतला आणि आता प्रताप सरनाईक हे एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष असणारं आहेत. याच्याआधी र.गो.सरैय्या हे महामंडळाचे पहिले अध्यक्ष होते. २०१४ ते २०१९ मध्ये दिवाकर रावते हे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते.

यानंतर अनिल परब यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी होती. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तेच राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यानंतर आता प्रताप सरनाईक यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

'महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची लोकवाहिनी असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिक दृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

या पदावर नियुक्त करून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे त्यांनी आभार मानले आहेत.'

## 'बीएमएस'ची ना. सर्बानंद सोनोवाल यांच्यासोबत बैठक

**उरण : बातमीदार**

नवी दिल्ली येथे केंद्रीय नौकानयन मंत्री माननीय सर्बानंद सोनोवाल यांच्यासोबत कामगारांच्या विविध प्रश्नावर भारतीय मजदूर संघाची (बीएमएस) बैठक झाली.



या बैठकीमध्ये मागील वेतन करारातील कामगारांच्या हिताचे पेंडिंग राहिलेले प्रश्न तसेच कॉन्ट्रॅक्ट लेबर यांचे सेवानिवृत्तीचे वय वर्ष साठ करावे आणि विविध पोर्ट मधील कामगारांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीत भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते, पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत राय, संतोष प्रधान विविध कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यातील तरुणांना कला, क्रिडा, संगीत व रोजगार क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणार –खासदार सुनील तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मूलभूत गरजा होत असताना भौतिक गरजा ही आवश्यक आहेत. याचबरोबर नागरिकांच्या व युवा पिढींच्या कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य व रोजगार या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी खासदार सुनील तटकरे यांनी रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी व्हीजन तयार केले आहे. त्यादृष्टीने रोहा शहरात वर्षभरात युनिक अकादमी, स्पर्धा परीक्षेतील तयारीसाठी यूपीसी एमपीसी साठी तयारी करुन घेण्यासाठी स्पर्धा परीक्षा केंद्र, संगीत अकादमी, कला अकादमी, क्रिडा प्रबोधनी, डिफेन्स करीअर अकॅडमी, व्यावसायीक प्रशिक्षण सुरू करणार असल्याचे रोहा ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत खासदार सुनील तटकरे यांनी माहिती दिली.



रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार सुनील तटकरे यांनी पुढाकार घेतला असून महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी विशेष लक्ष देऊन प्रयत्न सुरू केले आहेत.खासदार सुनील तटकरे पत्रकार परिषदेत माहिती देताना लवकरात रोहा शहरात सुपर मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल सुरू होणार आहे. चांगली आरोग्य सेवा नागरिकांना मिळावे या दृष्टीने अद्यावत रुग्णालय उभे राहत आहे. या दृष्टीने अदानी फाउंडेशन च्या वतीने तांत्रिक प्रक्रिया, नोकर भरती पूर्णत्वास जात असताना रुग्णालयातील कामही प्रगतीपथावर आहे.

रोहासह रायगड जिल्ह्यातील, कोकणातील तरुणांमध्ये गुणवत्ता आहे. परंतु स्पर्धा परीक्षासाठी सुविधा नसल्याचे ही बाब लक्षात घेत रोहा शहरांमध्ये लवकरात स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणार असल्याचे यावेळी सांगितले. वरदाई चारिटेबल ट्रस्टच्यावतीने रोहा शहरात संगीत अकॅडमी सुरू करणार आहे. या संदर्भात प्रसिद्ध गायक सुरेश वाडकर, वैशाली सामंत, अशोक हांडे, मृदुला जोशी यांच्याशी चर्चा करण्यात आले आहे. तेही लवकरात सुरू होणार आहे. त्यामुळे स्थानिक कलावंतांना या अकॅडमीमध्ये गायन, वाद्य प्रशिक्षण हे सर्व शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये पूर्ण वेळ तीन कोर्सेस घेण्यात येणार आहे.

प्रसिद्ध क्रिकेटपटू दिनेश लाड व प्रसिद्ध कबड्डीपटू अशोक शिंदे यांच्याशी चर्चा होऊन स्थानिक पातळीवर व जिल्हास्तरीय क्रीडापटूंना योग्य प्रशिक्षण मिळावे या दृष्टीकोनातून क्रीडा प्रबोधनी विशेषता राष्ट्रीय दर्जाच्या वरसे येथे बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे क्रीडा अकादमी सुरू करण्यात येणार आहे. रोहा शहरात इनडोअर व आउटडोर क्रीडापटूंना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील तरुणांना पश्चिम महाराष्ट्र व अन्यथा सैनिकी प्रशिक्षणासाठी जावे लागते हे प्रशिक्षण रायगड जिल्ह्यात मिळावे या दृष्टिकोनातून डिफेन्स अकॅडमी जे महाराष्ट्रात सहा ठिकाणी होणार आहेत. त्यापैकी एक रोहा येथे करण्यात येणार आहे. टाटा व राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणजेच जॉब वॉरंटेड कोर्सेस लवकरात सुरू करण्यात येणार आहे यासाठी त्याला तात्विक मान्यता मिळालेले आहे असे खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितले आहे.

राष्ट्रीय दर्जाचे म्हणजेच उच्च दर्जाचे, चांगले प्रशिक्षण, उत्तम प्रशिक्षक गुणवत्ताधारक प्रशिक्षण तरुणांन मिळावे या दृष्टिकोनातून चांगले प्रशिक्षित तज्ञ शोधण्याचे काम महिला व बालकल्याण मंत्री आदीती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून चालू असून या सर्व अकॅडमी या वर्षभरात सुरु होणार आहे. याचा फायदा तमाम रोहेकर, रायगडवासीय व कोकणवाशी यांना होणार आहे असे खासदार सुनील तटकरे यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले.

ना.आदिती तटकरे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी गटनेते महेंद्र गुजर, अहमद दर्जी, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, जितेंद्र पडवळ, नितीन पिंपळे अदि उपस्थित होते.

## पोलादपूर येथे श्रीकाळभैरवनाथांच्या जत्रोत्सवाला भाविकांची तुफान गर्दी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी व रवळनाथांची पालखी होलिकोत्सवानंतर जत्रोत्सवासाठी पोलादपूरच्या भैरवनाथनगर सहाणेवर आल्यानंतर रात्री उत्तरोत्तर या जत्रौत्सवाला प्रचंड संख्येने जनसमुदायाची उपस्थिती लाभली. या जत्रौत्सवामध्ये काटेतळी गावाच्या श्रीरामवरदायिनी अघोरी पथकाचे भव्यदिव्य सादरीकरण विशेष आकर्षण ठरले.

पोलादपूर ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी




देवस्थानच्या जत्रोत्सवावेळी काटेतळी, सडवली, चांभारगणी, मोरगिरी, फौजदारवाडी, चरई, वाकण, मोरगिरी गावठाण येथील सासणकाठया आणि देवांच्या पालख्यांचे आगमन दरवर्षीप्रमाणे झाले. मात्र, यावर्षी काटेतळी गावाच्या श्रीरामवरदायिनी अघोरी पथकाने पेहेराव, वेशभूषा आणि फटाक्यांची आतषबाजी, तांडवनृत्य, आगीचे फुत्कार तसेच उंच सासणकाठी नाचविणाऱ्या शेकडो तरूण तरूणींच्या डिजेच्या जोरदार ठेक्यांवरील नृत्यासह आकाशात रंगीबेरंगी फटाके सोडून केलेल्या सादरीकरणामुळे जत्रोत्सवातील भाविकांच्या मनाचा ठाव घेतला.

पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ देवस्थानचे सरपंच बाबूराव महाडीक यांच्यासह सर्व विश्वस्त मानकरी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी सेवाभावी वृत्तीने जत्रोत्सवाचे नियोजन केले. पहाटे काठया पालख्या श्रीकाळभैरवनाथ देवस्थान परिसरात जमा होऊन मोडजत्रेला सुरूवात झाली.



**अलिबाग : भगवान महावीर जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली होती.** (छाया : जितू शिगवण)

## ऐरोलीत अनधिकृत बांधकामावर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत एच ५४ व एच ७०, से–०४, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम ७ एप्रिल २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनील काठोळे, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे, जी विभाग ऐरोली येथील अधिकारी / कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलीस पथक उपस्थित होते.

## शिक्षक महासंघाच्या नवी मुंबई अध्यक्षपदी प्रा. वाघमारे

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ या शासनमान्य संघटनेच्या नवी मुंबई जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ यांची कार्यकारणी नुकताच ६ एप्रिल रोजी म. हो. विद्यालय, ठाणे येथे झाली.

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर, उल्हासनगर, नवी मुंबई या महानगरपालिका तसेच सर्व तालुक्यांमधील बहुसंख्य शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या कार्यकारिणी मध्ये सर्व महानगरपालिका व तालुका मधील नवीन पदाधिकारी




यांची नियुक्ती करण्यात आली. नवी मुंबई मनपा क्षेत्र अध्यक्षपदी प्रा अमोलकुमार वाघमारे यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ अध्यक्ष शरदचंद्र धारूरकर, मुंबई विभागीय सचिव अंकुर आहेर, ठाणे जिल्हाध्यक्ष प्रमोद वाघमोडे यांच्या हस्ते करण्यात आली.

नवी मुंबई मनपा क्षेत्र क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या कार्यकारिणी पुढील प्रमाणे प्रा.अमोलकुमार वाघमारे ( अध्यक्ष), गीतांजली आरोटे (उपाध्यक्ष), वैभव शिंदे ( सचिव), नागेश घाडगे (खजिनदार) ,मो. जाहीद काझी (कोषाध्यक्ष), अनिकेत सुपळे (संघटक), मानसी गुडुळकर (महिला आघाडी) पदी निवड करण्यात आले.

## रविवारी नवी मुंबईत खुशरंग संगीत महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ वाशी आणि हिंदुस्तानी संगीत अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी नवी मुंबईत खुशरंग संगीत महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

हा बहारदार संगीत सोहळा वाशी बस डेपोजवळील अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता सुरू होणार असून रात्री ९ वाजेपर्यंत रसिकांना शास्त्रीय संगीताचा सुरेल आनंद घेता येणार आहे. या महोत्सवात रायगडचे सुपुत्र सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी आणि वाराणसी येथील विदुषी शिवानी आचार्य यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. यावेळी अहिल्यानगर येथील प्रसिद्ध तबलावादक विश्वास जाधव यांचे सोलो तबला वादन होणार आहे. संगीत साथ म्हणून पं. निषाद पवार, पं. विनायक नाईक यांचे तबलावादन, अभिषेक काटे व सल्ला मनोज कुमार यांचे हार्मोनियम वादन होणार आहे. हा कार्यक्रम नवोदित कलाकारांपासून ते ज्येष्ठ संगीतरसिकांपर्यंत सगळ्यांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे.



# पान १ वरुन

## आदिवासींच्या पुनर्वसनासाठी आता मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

त्याला विरोध करण्यासाठी अगदी काल शेवटचे टोक आले त्यावेळेला मीसुद्धा त्या ठिकाणी हजर राहिलो, सिडकोच्या अधिकाऱ्यांनी मला चर्चेचा आमंत्रण दिले. त्यावेळेला सिडकोच्या ऑफिसमध्ये मी तिकडे जायचो आणि आणि इकडे त्यांनी कारवाई करायचा प्रयत्न करू नये यासाठी मी जाताना इशारा देऊन गेलो की, मी तिथे जाऊन परत येईपर्यंत कारवाई केली आणि जर माझी फसवणूक केली तर मी आत्मदहन करायलासुद्धा मागेपुढे करणार नाही, असा इशारा मी त्या ठिकाणी दिलेला होता.

सिडकोच्या कार्यालयात गेलो गेल्यावर तिथे सिडकोचे जॉईंट एमडी, सीईओ यांच्याबरोबर चर्चा केल्या. त्यांनी सांगितले पुनर्वसनाबाबतचे सिडकोने धोरण अस्तित्वात नाही आणि त्यामुळे आम्हाला त्यांना पुनर्वसनाचा कुठलाही शब्द देता येणार नाही. पुनर्वसन आम्ही करू शकणार नाही. यावर वारंवार चर्चा करून उदाहरण देऊन मी त्यांना सांगितले की, तुम्हाला ही पॉलिसी करावीच लागेल. ज्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी घरांना कायम करण्यात आले आणि प्रकल्पग्रस्तांची खरंतर गरजेपोटी सर्व बांधकाम कायम करण्याचा निर्णय आता शासनाने घेतला आहे आणि तोही २०२२ पर्यंतची सगळी. अशावेळेला या आदिवासी बांधवांची सन १९८० सालापासूनची घरे आहेत हीसुद्धा गरजेपोटी वंशावळीमुले विस्तार झाला असेल तर यालासुद्धा मान्यता दिली पाहिजे आणि गरज असेल सिडकोला त्यांना उठवण्याची तर त्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे अशी मागणी मी केली आणि त्यानंतर सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल यांच्याबरोबर चर्चा केल्यावर त्यांनी या संदर्भातला धोरण आम्ही सिडकोच्या बोर्डाकडे आणण्यासाठी मान्यता दिली, मात्र या संदर्भामध्ये आता त्या १२ घरांवरती कारवाई केलेली आहे. या १२ घरांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये सिडकोने जागा निर्माण करून द्यावी, अशी मागणी केली. त्याला सिडकोचे म्हणणे होते की, आम्हाला अधिकृतरित्या असे करता येणार नाही आणि त्यामुळे आम्ही आमच्या स्तरावर रेल्वेच्या ज्या कॉन्ट्रॅक्टरला काम करायचे होते ते ठेकेदार नाईक यांच्याबरोबर चर्चा करून अधिकृत नाही, पण त्यांना तात्पुरता निवारा होईल आणि पुनर्वसनाचे धोरण झाले की, त्यानंतर त्यांचे पुनर्वसन करता येईल अशी व्यवस्था केली होती, पण आजच्या दिवशी त्या आदिवासींशी चर्चा करताना त्या आदिवासींनी या संदर्भात सहकार्य करायला मनाई केली आणि त्याच्यामुळे सिडकोला ती कारवाई केल्याचे या ठिकाणी दिसत आहे. अशाच प्रकारचा विषय अमनदूत मेट्रो स्टेशनचा आहे, त्या ठिकाणी सिडकोला रस्ता करायचा होता म्हणून त्या ठिकाणी आदिवासी बांधवाना नोटीस जारी झाल्या होत्या त्यावेळीही मी सिडकोला पत्र दिले होते.

यापूर्वी डेडिकेटेड फ्लाईट कॉरिडॉर जो जातोय यामध्ये काही आदिवासींची घरे आसूडगाव करंजाडे या ठिकाणी होती. त्यांनाही यापूर्वी आदिवासींना तेथून विस्थापित करायचे होते. त्यावेळी काही घरांना भरपाई म्हणून त्यावेळी काहींना १५–१५ लाख रुपये दिले आहेत. यामुळे कधीना कधी तरी सिडकोला एखादा प्रोजेक्ट आणायचा आहे. जसे विमानतळसारखा प्रकल्प आला आणि १० गाव विस्थापित केली त्यांचे पुनर्वसन केले. आदिवासी हा समाजाचा घटक आहे. त्यामुळे पुनर्वसन केले पाहिजे हा आग्रह धरला व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी तसे धोरण आणण्याचे मान्य केले आणि मला खात्री आहे, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीससुद्धा या विषयामध्ये आम्हाला साथ देतील आणि याबाबतीमध्ये सकारात्मक दृष्टीकोनातून व्यवस्थापकीय संचालकांना असे धोरण तयार करण्याचे आदेश देतील त्या अनुषंगाने आम्ही मुख्यमंत्री महोदयांना लवकरच भेटणार आहोत.

## मुंबई–गोवा महामार्ग उद्या अवजड वाहनांसाठी बंद

ही वाहतूक बंदी अधिसूचना दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहीका, तसेच महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासाठी येणारी वाहने यांना लागू राहणार नाही, असेही जिल्हाधिकारी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

## कोळवाडी गावात विविध विकासकामांचे उद्घाटन

मार्गदर्शनाखाली अनेक विकासकामे पूर्ण केली जातील असा विश्वास व्यक्त केला. या कामाच्या उद्घाटनावेळी भाजपचे तालयका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, नाथाशेठ आगलावे, कृष्णाशेठ पाटील, रामशेठ पाटील, अंकुश पाटील, दिपक उलवेकर, जिवन सांगाडे, डॉक्टर संतोष आगलावे, भास्कर आगलावे, सुरेश आगलावे, सोपान आगलावे, गजानन भोईर, भगवान दरे, दगडु आगलावे, रामचंद्र म्हात्रे, डॉ.समीर आगलावे, बळीराम नाईक, योगेश आगलावे, प्रकाश आगलावे, महेंद्र आगलावे, गजानन आगलावे, जनार्दन आगलावे यांच्यासह कोळवाडी ग्रामस्थ मंडळाचे सदस्य आणि मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. गावकऱ्यांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त केले असून आमदार प्रशांत ठाकूर आणि भारतीय जनता पक्षाचे आभार मानले.

## भगवान महावीर जयंतीनिमित्त शोभायात्रा

उपप्रमुख शिव देवदा, भाजप जैन सेल रायगड सह–संयोजक संजय जैन, पनवेल समन्वयक राकेश कंठेड, स्टेशन अध्यक्ष राजेश बांठिया, अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे कोषाध्यक्ष महेंद्र जैन, भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष कदार भगत, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, नितीन मुनोथ, राजेश बांठिया, किरण परमार, चतुरमल मेहता यांच्यासह समाजातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुखवटा

### डॉ. मुकूंद साठये

**रेवदंडा:** रेवदंडयातील डॉ. मुकूंद राजाराम साठये यांचे नुकतेच अल्पशा आजाराने मुंबई येथे निधन झाले. बापूसाहेब नेने फांउडेशनच्या वतीने वैदयकिय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. मुकूंद साठये यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ते रेवदंडा डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्षपदी कार्यरत होते.



### कमला वैद्य

**कर्जत :** कर्जत नगर परिषद क्षेत्रात राहणाऱ्या कमला हरी वैद्य यांचे वृद्धापकाळाने १० एप्रिल रोजी निधन झाले. निधन समयी त्या १०१ वर्षाच्या होत्या. अखेरच्या क्षणापर्यंत निरोगी आयुष्य, आनंदी आयुष्य जगणाऱ्या आजी कर्जत हरिनाम सप्ताह मध्ये हिरारीने सहभाग घेत असत सध्या त्यांची चौथी पिढी कर्जत मध्ये राहत असून आजींना तीन नातू, दोन नाती, दोन पणतू दोन पणत्या असा मोठा परिवार आहे.



## निवडक

### दुचाकी झाडावर आदळून एकाचा मृत्यू




**पनवेल :** नवीन पनवेल भरधाव वेगात दुचाकी चालवताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी झाडावर आदळून झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे महामार्गावरील बारवाई गावच्या हद्दीत घडली. प्रशांत प्रकाश जाधव (३८, रा. कांबे, मोहोपाडा) असे दुचाकीस्वाराचे नाव असून प्रशांत जाधव हे त्यांच्या दुचाकीने मुंबई-पुणे महामार्गाच्या पुणे वाहिनीवरून बारवईकडून समता नगरकडे जात होता. दुचाकी बारवई गावच्या पुढे तालीब अँड श्यामसी कंपनीच्या समोर आले असता त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्यांची दुचाकी रस्त्याकडेच्या झाडाला धडकून हा अपघात झाला. या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### खारघरमध्ये भरदिवसा घरफोडी

**पनवेल :** भरदिवसा कड़ी-कोयंडा तोडून घरातील चार तोळे सोने, चांदी आणि ८० हजार रुपयांची रक्कम घेऊन चोरांनी पोबारा केल्याची घटना खारघर सेक्टर १० मध्ये घडली. खारघर सेक्टर १० कोपरगावमधील साई व्हीलामध्ये प्रवीणकुमार चौधरी (वय २८) राहतात. किरणा मालाचे दुकान चालवणारे प्रवीणकुमार काही कामानिमित्त घरातून बाहेर पडले होते. दरम्यान, घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरी केली. चोरांनी त्यांच्या घरातील चार तोळे सोने, चांदी आणि ८० हजार रुपयांची रक्कम लंपास केली. या घटनेची नोंद खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. दरम्यान, चौधरी यांच्या घरात चोरी करतेवेळी चोर सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.

### कोंढरी गावात हनुमान जन्मोत्सव



**उरण :** १२ एप्रिल २०२५ रोजी कोंढरीपाडा गावचे आराध्यदैवत श्री हनुमान देवाचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. पहाटे भजन, हनुमान जन्मकथा पोथीवाचन, देवाच्या मुकुटाची मिरवणूक, महाप्रसाद, सायंकाळी ज्येष्ठ भजन मंडळ कोंढरीपाडा यांचे भजन, रात्री पालखी मिरवणूक काढण्यात येईल. देवाच्या मुकुटाचा शतकोत्सव साजरा करण्यात येणार आहे तसेच विशेष आकर्षण उमेश पांचाळ आणि मित्रपरिवार यांनी केलेली आकर्षक मंदिराची सजावट, अशी माहिती कोंढरीपाडा गावचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी दिली.

# बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई

## न्हावा-शेवा वाहतूक शाखेकडून लाखोंचा दंड वसूल





**उरण : प्रतिनिधी**

न्हावा-शेवा वाहतूक शाखा अंतर्गत चालू वर्षी जेएनपीए परिसरात विशेष मोहीम राबवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण १०७०० वाहन चालका विरुद्ध मोटर वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कारवाई करून एकूण सहा लाख ९२,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

यामध्ये रस्त्यावर अवैध वाहने पार्क करणाऱ्या ४ हजार ४४१ वाहन चालक, वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर न करणाऱ्या १७७४ वाहन चालकाविरुद्ध, विदाऊट हेल्मेट दुचाकी वाहन चालविणाऱ्या दोन हजार ४५९ चालकाविरुद्ध, सिग्नल जंप करणाऱ्या एकूण ४०० वाहन चालकाविरुद्ध, तसेच मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या ४७ वाहन चालका विरुद्ध नवी मुंबई पोलीस उप आयुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

अशा रितीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण १० हजार ७०० वाहन चालका विरुद्ध मोटर वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कारवाई करून एकूण सहा लाख ९२,००० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. अशी माहिती न्हावा शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर यांनी दिली आहे.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७४५ रिक्षाचालकांना दंड

## खारघर वाहतूक पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वाहतूक पोलिसांनी परिसरात विनागणवेश, परवाना आणि विनापरमिट तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन व्यवसाय करणाऱ्या ७४५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केल्यामुळे रिक्षाचालकांचे धाबे दणाणले आहेत.

खारघर शहराचा वाढता विकास आणि लोकसंख्येमुळे रिक्षाचालकांच्या संख्येत वाढ होत आहे. दरम्यान, खारघर परिसरातील गावातील तसेच तळोजा, फरशीपाडा या गावातील जवळपास दोन हजार रिक्षाचालक व्यवसाय करीत आहेत. दरम्यान, रेल्वेने प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त प्रमाणात असल्यामुळे सायंकाळी ७ ते १० या वेळेत खारघर स्थानकाबाहेर विनागणवेश, विनापरवाना आणि विनापरमिट रिक्षाचालक घुसखोरी करून व्यवसाय करतात.

यामुळे स्थानिक आणि बाहेरील रिक्षाचालकांमध्ये किरकोळ वाद झाल्याचे प्रकार घडकीस आले आहेत. त्यामुळे खारघर वाहतूक शाखेने एक जानेवारी ते ३१ मार्चदरम्यान खारघर रेल्वेस्थानक, श्री माकड, डी मार्ट तसेच खारघरमधील विविध ठिकाणी मोहीम राबवून वाहतुकीचे नियम मोडणारे, अडथळा होईल अशा ठिकाणी रिक्षा उभी करणे, सिग्नल तोडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७४५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केल्याचे वपोनि संतोष कोण यांनी सांगितले.

## भरघोस परताव्याच्या आमिषाने गमावले ४९ लाख

**पनवेल : वार्ताहर**

सट्टा बाजाराशी कुठलाही संबंध नसताना केवळ फसवणुकीसाठी विविध अँपचे सहाय्य घेऊन एका व्यक्तीची तब्बल ४९ लाख ९४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

खारघर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीने समाज माध्यमात अल्पवधीत भरघोस परतावा मिळेल अशा आशयाची जाहिरात पाहिली. या जाहिरातीची लिंक उघडताच त्यांचा समावेश डीओ १ आयआयएफएल सिक्युरिटीज लिमिटेड नावाच्या व्हॉटसअॅप समूहात झाला. गुंतवणूक कुठे केली किती केली किती परतावा मिळाला आहे हे पाहण्यासाठी म्हणून काही अॅप त्यांना डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार फिर्यादी यांनी ते डाउनलोड केले. तसेच बँकेची माहिती दिली. त्यांनी या ठिकाणी दिलेल्या विविध बँक खात्यात तब्बल ४९ लाख ९९ हजार भरले. त्यांना परतावा दिसत असला तरी प्रत्यक्षात तो त्यांच्या बँक खात्यात वळता होत नव्हता. फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी तक्रार अर्ज दाखल केला.

## गाडी घेऊन पसार झालेला आरोपी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**



राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे एका गुन्ह्यासंदर्भात ताब्यात असलेली गाडी दुसऱ्या चावीद्वारे सुरू करून त्या गाडीसह तो फरार झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात या विभागाकडून करण्यात आली होती. त्या तक्रारीच्या आधारे पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने सदर आरोपीला मोखई, शिरूर परिसरातून ताब्यात घेतले आहे.

साधारण वर्षभरापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाने ४१९ किलो गांजासह दहा लाख रुपये किमतीची एक्सयुवी ७०० हि गाडी आरोपी आकाश चव्हाण (वय २८) याच्यासह ताब्यात घेतली होती. गुन्ह्यातील आरोपीने ही गाडी पुणे येथून भाड्याने घेतली होती. हि गाडी संबंधित विभागाकडे ताब्यात असल्याचे पाहून त्याने पुणे येथून गाडीची दुसरी चावी आणून रात्रीच्या वेळी गुन्ह्यातील गाडीसह पळून गेला.

याबाबतची तक्रार पनवेल शहरे पोलीस ठाण्यात दाखल होताच व पोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार, पोलीस हवालदार परेश म्हात्रे, अविनाश गंथाडे, अमोल डोईफोडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने शोध सुरू करत गाडी पुणे येथून आरोपीच्या नातेवाईकांच्या कडून ताब्यात घेतल, परंतु या गुन्ह्यातील मुख्य आरोपी आकाश चव्हाण याचा पत्ता लागत नव्हता अधिक शोध घेत असताना पोलीस हवालदार परेश म्हात्रे यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली कि सदर आरोपी हा त्यांच्या गावातील गाव कप क्रिक्रेट स्पर्धेत मॅच खेळण्यासाठी काशीचा माळ येथे सहभागी होणार आहे. व त्याचा जर्सी नंबर ३१ असल्याचे सांगितले. त्यानुसार या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचला.

आरोपीला पोलीस आल्याचा सुगाव लागल्याने तो क्रिकेट मैदान सोडून पळू लागला परंतु पोलीस हवालदार परेश म्हात्रे याने त्याचा पाठलाग केला, मात्र झटापटीत परेश म्हात्रे जखमी झाले. परंतु त्या स्थितीत हि त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीला पनवेलमध्ये आणुन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे ताब्यात देण्यात आले आहे. याबाबत पुढील तपास पोउनि विनोद लभडे करीत आहेत.



**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचा नातू श्रीयांश निलेश भगत याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी रहीम लदाप उपस्थित होते.**





**पनवेल : तालुक्यातील पडघे येथील कोळवाडी येथे श्री गावदेवी तुळजाभवानी माता व खंडोबा उत्सव गुरुवारी झाला. यानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, नाथाशेठ आगलावे, कृष्णाशेठ पाटील, रामशेठ पाटील, अंकुश पाटील, दिपक उलवेकर, जिवन सांगाडे, डॉक्टर संतोष आगलावे, भास्कर आगलावे, सुरेश आगलावे, सोपान आगलावे, गजानन भोईर, भगवान दरे, दगडु आगलावे, रामचंद्र म्हात्रे, डॉ.समीर आगलावे, बळीराम नाईक, योगेश आगलावे, प्रकाश आगलावे, महेंद्र आगलावे, गजानन आगलावे, जनार्दन आगलावे आदी उपस्थित होते.**

## मोफत कायदेशीर सल्ला पंधरवाडा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पनवेल, नवी मुंबई परीसरातील नामांकीत वकील, भाजपा ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, पनवेल मनपाचे माजी नगरसेवक, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष, अखिल भारतीय अधिवक्ता परीषद, पनवेल तालुका अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत कायदेशीर सल्ला पंधरवाडा या उपक्रमाचे आयोजन १० एप्रिलपासून करण्यात आले आहे.

अॅड. मनोज भुजबळ हे पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष या नात्याने सदैव वकीलांचे पाठीशी उभे असतात. ते समाजसेवेत, राजकीय क्षेत्रात असलेने त्यांचेकडे नेहमीच अन्याय, अत्याचार झालेले व्यक्ती येत असतात. त्यामुळे अॅड. मनोज भुजबळ यांचे कार्याने प्रेरीत होवून त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'मोफत कायदेशीर सल्ला पंधरवाडा' या उपक्रमाचे माध्यमातून त्यांना अनोख्या शुभेच्छा देण्याचा अॅड. किशोर धाकड, पनवेल यांचा मानस आहे. १० ते २४ एप्रिल या कालावधीत धाकड विचार मंचतर्फे अॅड. किशोर धाकड, पनवेल हे 'मोफत कायदेशीर सल्ला पंधरवाडा' हा उपक्रम राबविणार असून ज्या कोणावरही समाजातील कोणत्याही घटकाकडून, वर्गाकडून अन्याय, अत्याचार, फसवणूक झाली असेल त्यांनी अॅड. किशोर धाकड, पनवेल यांचेकडे संपर्क साधून संधीचा लाभ घ्यावा. यासाठी शॉप नं.२१, म्युनसिपल शॉपिंग कॉम्पलेक्स, पहिला माळा, फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल येथे भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ९८६७०५१३३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमधील क्षयरोगमुक्त ३२ ग्रामपंचायतींचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान अंतर्गत ९ एप्रिल रोजी पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतीपैकी ३२ ग्रामपंचायतींचा सत्कार पंचायत समिती कार्यालय पनवेल येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास पंचायत समिती पनवेलच्या विस्तार अधिकारी मीनल कनोजे, वैद्यकीय अधिकारी डॉ.आकाश वावेकर, डॉ प्रभाकर पाटील, डॉ.सायली मानकर, डॉ. प्रणव उरणकर, डॉ. अब्दुल करीम रझाक उपस्थित होते.

पात्र ३२ ग्रामपंचायतींपैकी ६ ग्रामपंचायती पालेबुद्रुक, खैरवाडी, बारवई, भाताण, जांभिवली, पोसरी या सलग दुसऱ्या वर्षी क्षयरोग मुक्त म्हणून पात्र झाल्या व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या रजत पुतळ्याच्या व प्रशस्ती पत्राच्या मानकरी ठरल्या.

उर्वरित २६ ग्रामपंचायती देवळोली, सावळे, गुळसुंदे, कराडे खुर्द, दिघाटी, चिखले, वाकडी, दुंदरे, उमरोली, वाघिवली, तुराडे, नांदगाव, सोमटणे, शिरवली, चिंधरण, केळवणे, पोयंजे, खानाव, मालडुंगी, नितळस, गव्हाण, न्हावा, तरघर, ओवळा, पारगाव, वडघर या ताम्र पुतळ्याच्या व प्रशस्ती पत्राच्या मानकरी ठरल्या. पात्र ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी म्हणून सरपंच ,वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होते.

डॉ.अपर्णा पवार यांनी सर्व ग्रामपंचायतींचे अभिनंदन केले तसेच येत्या वर्षात सर्व ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उत्कृष्ट काम केल्याबद्दल डॉ.आकाश वावेकर (वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र नेरे), डॉ. प्राजक्ता देबाजे (समुदाय आरोग्य अधिकारी उपकेंद्र वलप), राजाराम चव्हाण ( आरोग्य सहाय्यक नेरे), स्मिता मढवी (औषधनिर्माण अधिकारी प्रा. आ.केंद्र अजिवली) आदेश गडग (प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रा. आ.केंद्र वावंजे) शेखर घरत (आरोग्य सेवक प्रा.आ केंद्र आपटा), सुलभा गायकर (गट प्रवर्तक गव्हाण), रुक्मिणी कांबळे (आशा स्वयंसेविका गव्हाण) यांचा सत्कार करण्यात आला. तसेच निक्षय मित्र हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमीटेड तळोजाचे सी. एस. आर. मॅनेजर लहू रौंदळ आणि नंदिनी यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका आरोग्य सहाय्यक शरद बडे यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय येथील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'रयत'च्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये गव्हाण विद्यालयाच्या सैन्य समूहाची कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने संस्थेच्या पाचही विभागात विभाग स्तरावर घेतल्या जाणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांची रायगड विभागीय स्तराची निवड फेरी वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये नुकतीच संपन्न झाली. या फेरीत रायगड विभागातील संस्थेच्या तब्बल २० शाळांनी सहभाग नोंदवला.त्यात संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या नृत्य चमूने सैन्य दलाच्या थीमवर आधारित गीतावर सादर केलेल्या नृत्याविष्काराने सर्वांची वाहवा मिळवली.संस्थेच्या रायगड विभागातून आठ शाळांच्या समूह नृत्यांच्या सातारा येथे संस्था पातळीवर झालेल्या निवडीमध्ये गव्हाण विद्यालयाने स्थान निश्चित केले.

श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनियर कॉलेज गव्हाणकोपर च्या शिरपेचातील हा आणखी एक मानाचा तुरा असून या समूह नृत्यामध्ये विद्यालयाचे आर्या अनिल कडू, वैदेही मोकाशी, वैष्णवी चिकणे, सिद्धेश कांबळे, संस्कृती वैराट, दुलारी राजभर, नित्या पाटील, आरोही नाळे, अर्चना चव्हाण, आर्यन गुडदे सुयश चिकणे, मृत्युंजय भारती, ओम सांगळे सुयश चिकणे, अमित डांगर इत्यादी पंधरा विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ठ नृत्याविष्कार सादर केला आणि परीक्षकांची आणि उपस्थित प्रेक्षकांची मनी जिंकली. या नृत्या साठी विद्यालयाच्या संगणक शिक्षिका सोनाली घरत यांनी विशेष प्रयत्नपूर्वक नृत्यदिग्दर्शन केले. त्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील तसेच कला शिक्षक भोईर जी.जी.व उपशिक्षक विशांत ठाकूर यांची विशेष साथ लाभली.

या वेळी परीक्षक म्हणून प्राजक्ता गावंड (वावंजे), स्मिता पाटील (जुचंद्र शाखा) आणि खुटले मॅडम (रिटघर शाखा) या परीक्षक म्हणून लाभल्या. या वेळी कार्यक्रमाचे खास परीक्षण करण्यासाठी साताऱ्याहून संजय संकपाळ सर आणि अमोल बोधे, रायगड विभागीय कार्यालयाचे संतोष गुजर,कामोठे शाखेचे हेमंत पेरवी आदींची खास उपस्थिती लाभली.

या वेळी रायगड विभागातील डोळखांब, सह्याद्री नगर, रिटघर, मार्केट यार्ड, द्रोणागिरी करंजा, पळस्पे, मॉडर्न स्कूल वाशी पिरकोन, कामोठे, सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर (उलवे), नावडे इत्यादी वीस शाळा सहभागी होत्या.यावेळी सामाजिक संदेश, देशभक्तीपर व लोककला या विषयांवर आधारित स्पर्धा पार पडली.

श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण शाखेकडून उत्कृष्ट असं भारतीय सैनिकांना मानवंदना देणारा आर्मी डान्स सादर करण्यात आला आणि या कार्यक्रमाची निवड सातारा येथे संपन्न होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी अगदी एकमताने झाल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर तसेच ज्येष्ठ शिक्षक रंधवे एस.एस.यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या वेळी गव्हाण शाळेतील संपूर्ण शाळा प्रशासनाकडून या संपूर्ण गव्हाण टीमचे कौतुक केले जात आहे.

## संपादकीय

# ममता बॅनर्जी अडचणीत

पश्चिम बंगालमधील शिक्षक भरती घोटाळ्यातील सीबीआय चौकशीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. यामुळे त्या राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना काहिसा दिलासा मिळाला असला तरी ही संपूर्ण शिक्षक भरती प्रक्रियाच अवैध ठरवून सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच ममता बॅनर्जी सरकारला मोठा दणका दिला आहे.

**कोलकाता उच्च न्यायालयाने शालेय कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त पदे वाढवण्याच्या पश्चिम बंगाल मंत्रिमंडळाच्या निर्णयाची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश यापूर्वी दिले होते. त्यावर मंत्रिमंडळाचे निर्णय न्यायालयीन तपासणीच्या अधीन नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले असून २५ हजार ७५३ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची चौकशी मात्र सुरूच राहील असे स्पष्ट केले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर पदांसाठी उमेदवारांची निवड करतानाच्या प्रक्रियेत छेडछाड झाली आहे. ही संपूर्ण निवड प्रक्रियाच त्रुटीपूर्ण व निराकरणापलीकडे कलुषित आहे असे निरीक्षण नोंदवित या प्रकरणातील सर्वच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती रद्द करण्याचा कोलकाता न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गेल्याच आठवड्यात कायम ठेवला. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालमधील २५ हजार ७५३ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालानंतर पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पक्षाने या सर्व प्रकाराला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या जबाबदार असल्याचा आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. ममता यांच्या राजवटीत राज्यातील शिक्षित बेरोजगार तरुणांची गुणवत्ता पैशाच्या बदल्यात विकली गेली हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने अधोरेखित झाले आहे. त्यामुळे या घोटाळ्याची जबाबदारी स्वीकारून ममता यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी भाजपकडून करण्यात आली. तर ममता यांनी मात्र नेहमीच्या नाट्यपूर्ण शैलीतच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया व्यक्त केली. मी जिवंत असेपर्यंत कोणताही शिक्षक आपली नोकरी गमावणार नाही असे ममता यांनी म्हटले आहे. बंगालला हेतुपुरस्सर लक्ष्य केले जात आहे हा नेहमीचा सूरही त्यांनी आळवला व भाजपला पश्चिम बंगालमधील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करायची आहे का, अशी कांगावाखोर विचारणाही केली. आपण नव्याने भरती प्रक्रिया राबवणार असून जे उमेदवार दोषी नाहीत ते नवीन भरतीप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतात. येत्या तीन महिन्यांत नवीन नियुक्त्यांची प्रक्रिया पूर्ण केली जाईल असेही ममता यांनी म्हटले आहे. वास्तवात कोलकाता उच्च न्यायालयानेच नव्याने निवड प्रक्रिया सुरू करण्याचे व ती तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश तृणमूल काँग्रेस सरकारला दिले होते. तो निकालच सर्वोच्च न्यायालयात कायम झाला. ममता बॅनर्जी सरकारने २०१६ मध्ये राज्यस्तरीय निवड चाचणीद्वारे सरकारी आणि अनुदानित शाळांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली. यात २४ हजार ६४० रिक्त पदांसाठी २३ लाखांहून अधिक लोकांनी भाग घेतला. या भरतीमध्ये ५ ते १५ लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी कोलकाता उच्च न्यायालयात अनेक तक्रारी आल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभेची निवडणूक आहे. गेल्या वर्षी आर.जे. कार वैद्यकीय महाविद्यालयातील शिकाऊ डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येमुळे पश्चिम बंगालमधील जनमत प्रचंड प्रमाणात ममता बॅनर्जी यांच्या विरोधात गेले आहे. त्यात आता शिक्षक भरतीतील नियुक्त्या रद्द झाल्याने हे सर्व शिक्षक रस्त्यावर उतरले आहेत. एकंदरीत ममता बॅनर्जी चांगल्याच अडचणीत आल्या आहेत.**

# प्रत्येक जिल्ह्याची लीग कबड्डी स्पर्धा व्हायला हवी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



प्रो-कबड्डीतून प्रेरणा घेऊन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने अलिबागमध्ये रायगड कबड्डी लीग स्पर्धा २०२५ आयोजित केली. जिल्ह्याची लीग स्पर्धा असून देखील खेळाडूना चांगली बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेचे आयोजन उत्तम होते. अशाचप्रकारे महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याची लीग कबड्डी स्पर्धा व्हायला हवी. त्यातून महाराष्ट्रात चांगले कबड्डी खेळडू तयार होतील. लीग स्पर्धांचे आयोजन करताना स्थानिक संघांच्या स्पार्धांवर त्याचा परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. खेळाडूंच्या तंदुरीस्तीचा देखील विचार करावा लागेल.

लीग स्पर्धा धंदेवाइक आहेत. केवळ पैसा मिळविण्यासाठी या स्पर्धा होतात. त्यामुळे मुळ कबड्डी संपेल. कबड्डीचे स्थानिक संघ कमी होतील. कबड्डीची क्लब संस्कृती संपेल अशी टीका होतेय . हे काही अंशी खर आहे. परंतु कबड्डी हा खेळ केवळ मध्यमवर्ग खेळत होता व पहात होता. प्रो-कबड्डीमुळे उच्च वर्ग देखील या खेळाकडे वळू लागला आहे. अपल्याला प्रो- कबड्डीत खेळायचे आहे म्हणून तरूण खेळाडू या खेळाकडे वळतायत. जे लोक कबड्डीला कमी लेखायचे ते आता कबड्डीकडे वेगळ्या दृष्टीकोणातून पाहू लागलेत. कबड्डी खेळणारे संघ वाढू लागलेत. त्यामुळे कबड्डी खेळणारे संघ वाढेत. खेळाडूना पैसा मिळेल .खेळाडूंचे करीयर होईल. प्रो - कबड्डीत प्रत्येक खेळाडूला संधी मिळेलच असे नाही. अनेक गुणवान खेळाडू असतात त्यांना अश्या स्पर्धांमध्ये खेळण्याची संघी मिळत नाही. त्यामुळे रायगड प्रमाणे प्रत्येक जिल्ह्याची लीग कबड्डी स्पर्धा झाली तर खेळाडूंना या स्पर्धांमध्ये खेळण्याची संधी मिळेल.

पूर्वी कबड्डी हा खेळ कौशल्यावर खेळला जायचा. आता हा खेळ वेग आणि ताकदीचा बनलाय. वेग आणि ताकदी पेक्षा कौशल्य महत्वाचे आहे. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ आहे. कबड्डी हा खेळ एक विरूध्द सात असा आहे. एकाची ताकद सात माणसांसमोर कमीच पडणार. तेथे कोशल्यच वापरली पाहीजे. महाराष्ट्रकडे कबड्डी खेळाची कौशल्ये आहेत. ती आपली ताकद आहे. परंतु आपण इतर राज्याचे अनुकरण करत आहोत. ताकद वापरण्याचा प्रयत्न करतो. त्यात फसतो. कबड्डीतील कौशल्ये ही महाराष्ट्रची खरी ताकद आहे. महाराष्ट्राने कबड्डीतल कौशल्य जपील पाहिजे. वेग आणि ताकद हवीच परंतु कौशल्ये देखील तितकीच महत्वाची आहेत. महाराष्ट्रने कबड्डीतील कौशल्ये वापरली तर महाराष्ट्र नक्की राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत विजेतपद मिळवू शकतो. महाराष्ट्रला कबड्डीत गतवैभव प्राप्त होऊ शकते.

कबड्डीतील कौशल्य वाढविण्यासाठी रायगड कबड्डी लीग प्रमाणे प्रत्येक जिल्ह्याची कबड्डी लीग स्पर्धा व्हायला हवी. हे करत असताना खेळाडूंच्या तंदुरुस्तीचा देखील विचार केला पाहिजे. लीग स्पर्धांचा अतिरेक होणार नाही, स्थानिक स्पर्धावर परिणाम होणार नाही याची दक्षता जिल्हा संघटनांना घ्यावी लागेल. प्रत्येक जिल्ह्यात एका हंगामात एकाच अधिकृत लीग कबड्डी स्पर्धा खेळवली गेली पाहिजे. जर अश्या लीग स्पर्धां एका जिल्ह्यात अधिक होऊ लागल्या तर त्याचे महत्व रहाणार नाही. त्याला चौरंगी स्पर्धेचे स्वरूप येईल. खेळाडूच्या तंदुरुस्तीवर त्याचा वाईट परिणाम होईल. खेळाडू जखमी होण्याचे प्रमाण वाढेल . याचा विचार देखील करायला हवा.

**कबड्डीत शिस्त येणार कधी**

रायगड कबड्डी लीग स्पर्धेचे आयोजन उत्तम होते. परंतु या स्पर्धेत देखील खेळाडूंचा बेशिस्तपणा दिसून आला. बाद झालेल्या खेळाडूला राखीवक्षेत्रातून जाण्यासाठी पंचांना सांगावे लागत होते. रिव्हीवची सुविधा असताना देखील क्रीडांगणावरील वाद मिटवण्यासाठी ज्येष्ठ खेळाडूना मैदानात यावे लागले. हे योग्य नाही. पंच आणि खेळाडूंनी याबबत विचार केला पाहिजे. बेशिस्तपणाला केवळ खेळाडू जबादार आहेत असे नाही , पंच देखील जबाबदार आहेत. पंचांचे निर्णय चुकतात. झटापटीच्या वेळी पंचांचा निर्णय चुकला तर तो मान्य. परंतु बोनस गुण देताना देखील पंच चूका करत असतील तर त्यातून पंचांचा दर्जा सिद्ध होतो. कबड्डीत शिस्त आणायची असेल तर खेळाडूंनी स्वतः ला शिस्त लावून घेतली पाहिजेच त्याचबरोबर पंचानी देखील आत्मपरीक्षण केले पाहिजे.

# रोहिणी हटंगडी यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास



रोहिणी हटंगडी ह्या एक ज्येष्ठ आणि अनुभवी भारतीय अभिनेत्री आहेत, ज्यांनी रंगभूमी, चित्रपट आणि दूरदर्शन या तिन्ही क्षेत्रांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. त्यांचा जन्म ११ एप्रिल १९५५ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव रोहिणी ओक होते आणि त्यांचं लग्न नामवंत रंगकर्मी जयदेव हटंगडी यांच्याशी झालं. त्यांनी पुण्याच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामधून अभिनयाचं प्रशिक्षण घेतलं, जिथे त्या त्यांच्या बॅचमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या होत्या.

रोहिणी हटंगडी यांना खरी ओळख मिळाली १९८२ साली प्रदर्शित झालेल्या गांधी या रिचर्ड ॲटनबरो यांच्या आंतरराष्ट्रीय चित्रपटातून, ज्यात त्यांनी कस्तुरबा गांधी यांची भूमिका साकारली होती. त्या भूमिका करताना त्यांचं वय केवळ २७ वर्षांचं होतं, पण त्यांनी ती वृद्ध व्यक्तिरेखा इतक्या कौशल्याने साकारली की त्यांचं नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलं. त्या चित्रपटासाठी त्यांना बाफ्टा या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरवण्यात आलं, आणि त्या हा पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय अभिनेत्री ठरल्या.

त्यांनी हिंदी, मराठी, तेलुगू आणि कन्नड अशा विविध भाषांतील चित्रपटांमध्ये काम केलं आहे. सरांश, अर्थ, राजू बन गया जेंटलमन, मुन्नाभाई एम.बी.बी.एस., लगे रहो मुन्नाभाई, अग्निपथ आणि भूमिका हे त्यांचे काही उल्लेखनीय चित्रपट आहेत. त्यांनी अनेक मालिकांमध्येही काम केलं आहे, जसं की कुटुंब, चरित्रहीन आणि गोधडी.

नाटक हे रोहिणी हटंगडी यांचं पहिलं प्रेम आहे. त्यांनी जयदेव हटंगडी यांच्यासोबत मिळून 'कल्पना कला मंच' नावाचं नाट्यसंस्थेची स्थापना केली. त्यांनी अनेक शेक्सपिअर नाटकांचे सुद्धा मराठी रुपांतरात सशक्त सादरीकरण केलं आहे.

त्यांच्या कारकीर्दीला अनेक पुरस्कार मिळाले असून, त्यात पद्मश्री (१९९०), नाट्यदर्पण पुरस्कार, फिल्मफेअर, आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार यांचा समावेश आहे. रोहिणी हटंगडी या आजही आपल्या अभिनयाने रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.

(साभार : चॅट जीपीटी)

## बदलते तंत्रज्ञान

# ॲपल युजर्ससाठी हाय अलर्ट; हॅक होऊ शकतो आयफोन



आयफोन, आयपॅड, मॅकबुकसारखी महागडी डिव्हाईसेस वापरणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या संस्थेने तुमची ॲपल डिव्हाईस हॅक होऊ शकतात, असा इशारा दिला आहे. ॲपलच्या डिव्हाईसेसमध्ये अनेक कमतरता असून त्याद्वारे हॅकर्स तुम्हाला लक्ष्य करू शकतात असे म्हटले गेले आहे.

ॲपलची उत्पादने बहुतांश श्रीमंत लोक, महत्वाची लोक वापरत असतात. सर्वात सुरक्षित म्हणून या कंपनीच्या उत्पादनांची ख्याती आहे, परंतु गेल्या काही काळात ॲपलची डिव्हाईस हॅक केल्याची प्रकरणे राजकारणी, उद्योजकांसोबत घडली आहेत. संसदेतही याची वाच्यता झाली आहे. भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणारी संस्था CERT-In (इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) ने हा इशारा दिला आहे.


ॲपल डिव्हाईसमध्ये अनेक सुरक्षा त्रुटी आहेत. हॅकर्सनी याचा वापर केला तर ते तुमच्या डिव्हाइसवर पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात किंवा तुमचा डेटा चोरी करू शकतात. सिस्टम पूर्णपणे क्रॅश करू शकतात, असा इशारा सीईआरटी ईनने दिला आहे. आयफोन, आयपॅड, मॅकबुक, ॲपल टीव्ही अशा उपकरणांचा यात समावेश आहे.

सुरक्षा यंत्रणा बायपास करण्यासारख्या त्रुटी यात आहेत. स्पूफिंग किंवा सेवा नाकारणे (DoS) हल्ले करू शकतात. सिस्टिममधील तुमचे अधिकार वापरू शकतात, असे CIVN-२०२५-००७१ या गाईडलाईन्समध्ये म्हटले आहे. हा धोक्याच्या इशारा उच्च पातळीच्या श्रेणीत ठेवण्यात आला असून जर तुमच्याकडील डिव्हाईसेस वेळेत अपडेट केली नाहीत तर ती हॅकर्सच्या नियंत्रणात जाण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. तुमचा डेटा बदलू शकतात. यामुळे सीईआरटीने सावध राहण्यास सांगितले आहे.

विविध कंपन्या आपल्या ग्राहकांसाठी फोन, आयफोन बाजारात आणतात आणि त्यामध्ये वेगवेगळी फिचर्स देतात, मात्र हॅकर्स टपून बसलेले असतात. त्यांच्यापासून सावध राहणे गरजेचे आहे.

# समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले

**निमित्त**



महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत म्हणजे महात्मा जोतीराव गोविंदराव फुले. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सावता माळी समाजातील गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले. जोतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला.

जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचा वेध लागला होता. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालांत परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा मांग यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर १८४०मध्ये जोतीरावांचा विवाह सातारा जिल्ह्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे-पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईंचे शिक्षण जोतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने जोतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या.

जगाचा, पश्चिमी देशांचा व विशेषतः भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास जोतीरावांनी इंग्रजीमधून वाचला आणि सखोलपणे त्यावर मनन केले. अमेरिकन राज्यक्रांतीच्या इतिहासाची त्यांच्या मनावर खोल छाप पडली. द राइट्स ऑफ मॅन (१७९१-९२) या टॉमस पेन (१७३७-१८०९) याच्या ग्रंथाची त्यांनी अनेक पारायणे केली. मानवी समतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्येयवाद आत्मसात केला. या तत्त्वांच्या आधारे ते भारतीय समाजाचे उत्कृष्ट चिंतन करू शकले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले. वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा अभ्यास केला. कबीराच्या बीजक ग्रंथातील 'विप्रमति' या प्रकरणाचा त्यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडला. त्यांनी एका ठिकाणी स्वतःचा 'कबीर साधूच्या पंथाचा' असा निर्देश केला आहे. अशा चिंतन मननाने त्यांची भारतीय समाजक्रांतीची विचारसरणी तयार झाली. जगातील क्रांतिकारकांच्या नेत्यांमध्ये शोषित समाजातून पुढे आलेले यांच्यासारखे नेते फार थोडे, कार्ल मार्क्स, लेनिन इ. मध्यमवर्गीय नेते कामगारक्रांतीचे पुरस्कर्ते झाले. फुले, आंबेडकर हे शोषित समाजातून निर्माण झाले. हे त्यांचे वैशिष्ट्य होय.

जोतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे.. ''विद्येविना मति गेली मतीविना नीति गेली नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' त्यांनी हा निष्कर्ष शेतकऱ्याचा आसूड (१८८३)मध्ये प्रारंभी सांगितला आहे.


जोतीराव फुले यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई (१८३१-९७) यांनी अनन्यभावाने आयुष्यभर सहकार्य दिले. स्त्रीमुक्तिआंदोलनाची महाराष्ट्रातील पहिली अग्रणी म्हणून महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास त्यांची दखल जरूर घेईल. जोतीरावांची सगळी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली होती. २८ नोव्हेंबर १८९० रोजी जोतीराव यांचे निधन झाले. त्यानंतरही सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा सावित्रीबाईंनी वाहिली. (साभार : मराठी विश्वकोष)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# उष्णतेमुळे उन्हाळी लागल्यास काय करावे?



उन्हाळ्यात जरादेखील तापमान वाढले की अंगाची लाही लाही होते. अनेकवेळा शरीरात पाणी कमी पडून अशक्तपणा येणे, चक्कर येणे आणि उन्हाळी लागण्यासारखे प्रकार घडतात. शरीरातील उष्णता खेचली जावी यासाठी काही वेळा बेंबीमध्ये खाण्याच चुना लावला जातो. परिणामी थोडा फरक पडतो, पण काहींना संपूर्ण उन्हाळा हा त्रास होत राहतो. उन्हाळी लागणे सामान्य गोष्ट आहे. उन्हाळी लागल्यानंतर फार घाबरून जाण्याचे कारण नाही. तुम्ही घरच्या घरी उपाय करून होणारा त्रास कमी करू शकता.

सोप्या भाषेत उन्हाळी लागणे म्हणजे लघवी करताना मूत्रमार्गाला दाह जाणवतो. कधी औषधांच्या अतिसेवनानेदेखील उन्हाळी लागते, तर मूत्रमार्गात इनफेक्शन झाल्यामुळेही उन्हाळी लागते. जर उन्हाळी तीव्र झाल्यास लघवीच्या जागी तीव्र वेदना होतात आणि जळजळ होते. कधी कधी प्रायव्हेट पार्टवर पुरळ अथवा लाल चट्टे पडतात. मूत्रमार्गाला दाह होतो. अशा यावर तुम्हाा घरच्या घरी उपाय करू शकता

भरपूर पाणी प्या - उन्हाळा सुरु झाला की, लगेच पाणी पिण्याचे प्रमाण वाढवा. पुरेसे पाणी प्यायले नाही तर शरीर डिहायड्रेट होतं. परिमामी, काही वेळा ताप पण येतो. त्यामुळे तहन लागली की लगेच पाणी प्या.

लिंबू सरबत प्या - शरीरात ओलावा टिकून राहण्यासाठी दिवसभरात १०-१२ ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. या पाण्यात तुम्ही सब्जा बीदेखील घालून पिऊ शकता. लिंबू सरबत करून प्या.

नाचणीची आंबील प्या- नाचणीमध्ये कॅल्शियम, प्रोटीन, आयर्न, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम फायबर, कार्बोहायड्रेड्स हे पोषक घटक मोठ्या प्रमाणात मिळतात. नाचणी आंबील प्यायल्याने सिडीटी, गॅस होणे, जळजळ होणे, अपचन असे पोटासंबंधित आजार होत नाहीत.

जिरे, धनेपूड, कोथिंबीर घालून ताक प्यावे - ताक हे शरीरातील विषारी पदार्थ मूत्रावाटे बाहेर काढते. दह्यासोबत जिरं खावं. पण, जिऱ्याचं अतिसेवनही करू नये. जलजिरा हे उन्हाळ्यात तहान भागवतं. पचनक्रिया सुधारण्यासाठी जिरे पावड घालून ताक प्यावे. शरीराला उन्हाचा त्रास होण्यापासून हे पेय वाचवतं. धने हे पोटातील दाह कमी करते. ताकामधून कॅल्शियम, फॉस्फरस व लॅक्टोबॅसिलस मिळते.

व्हिटॅमिन सी आहार घ्या - उन्हाळ्यात व्हिटॅमिन सीयुक्त संत्री, लिंबू, पपई, मोसंबी, पेरू, किवी, आंबा खायला हवे.

# ‘नम्र आणि जमिनीवर असणारा माणूस कधीही मागे पडणार नाही’




**कर्जत : प्रतिनिधी**

मी अनेक महिन्यांनी कर्जतमध्ये आलो. गेली पस्तीस वर्षे मी कर्जतमध्ये दर पंधरा दिवसांनी येत होतो. त्याला मध्यंतरी घडलेले राजकारण कारणीभूत होते. नम्रपणे जमिनीवर असणारा माणूस कधीही राजकारणात किंवा समाजकारणात मागे पडणार नाही. हे गुण सुधाकर घारे यांच्यामध्ये आहेत. अपक्ष उमेदवाराला नव्वद हजारा पर्यंत मते मिळणे ही साधी गोष्ट नाही. पराभूत होऊनही त्यांनी आपला एकही कार्यकर्ता इकडे तिकडे जाऊ दिला नाही. यातच सारे काही आले. त्यांच्यासाठी लवकरच आनंदोत्सव साजरा करण्यात येईल.

मी सुद्धा पहिल्या निवडणुकीत पराभूत झालो होतो पण जिद्द सोडली नाही. सर्वांना बरोबर घेऊन काम करत राहिलो म्हणून मी आज येथे आहे. श्रीवर्धन मतदार संघात जितका निधी मिळतो त्यापेक्षा काकणभर जास्त निधी या मतदार संघात मिळेल. येथील नव्याने होत असलेल्या रेल्वे स्थानकाला हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव देण्यासाठी पाठपुरावा करणार असून आदिवासिंसाठी सांस्कृतिक भवन पुढील वर्षाच्या ९ एप्रिल पर्यंत उभारले जाईल.’ असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी येथे दिले.

कर्जत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने रॉयल गार्डनच्या खुल्या मैदानावर कार्यकर्ता संवाद मेळावा व प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अन्न व नागरी पुरवठा मंत्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करुन समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी आमदार हिरामण खोसकर, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, भरत भगत, अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, भगवान भोईर, दत्ता मसूरकर, उमा मुंढे, संतोष बैलमारे, दीपक श्रीखंडे, अजय सावंत, ॲड. रंजना धुळे, नारायण डामसे, जयवंती हिंदोळा, मधुकर घारे, गजानन देशमुख, रवींद्र झांजे, सचिन करणूक, जयेंद्र देशमुख, अरुण मालुसरे आदींसह माजी नगरसेवक आदी उपस्थित होते.

नरहरी झिरवळ यांनी, ’ पराभवाने खचून न जाता जिद्दीने पुन्हा भरारी घ्यावी. या तालुक्यात आदिवासी समाज खूप मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्याकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्याने त्यांना वयक्तिक योजनांचा लाभ घेता येत नाही म्हणून आपल्या पक्षाच्या वतीने शिबिरांचे आयोजन करून जागेवर दाखले तयार करून द्यावेत. ’ असे सूचित केले. यानंतर शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यांचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन समीर सोमणे यांनी केले.

अशोक भोपतराव यांनी, ’तटकरे यांच्या बरोबर आम्ही पस्तीस वर्षे आहोत. यापुढे त्यांच्यावर टीका केल्यास आम्ही ती सहन करणार नाही.’ असे सांगितले. सचिन करणूक यांनी ’ मी १९ वर्ष मनसेचे काम केले मात्र घारे यांच्या कार्यपद्धतीमुळे मी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करीत आहे. मला सामावून घ्या.’ अशी विनंती केली. सुधाकर घारे यांनी, ’ आमच्या नेत्यांना कुठेही अडचण होऊ नये म्हणून सर्वांनी सामुदायिक राजीनामे देऊन अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. मात्र सुनील तटकरे यांनी खोपोली कडे लक्ष दिले असते. तर मात्र मी आज तुमच्या समोर आमदार म्हणून असतो. परंतु त्यांची सुद्धा अडचण होती. आता पुढील निवडणुकांमध्ये लक्ष घालून जास्तीत जास्त यश कसे मिळेल ते आपण पाहू.’ असे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

याप्रसंगी मनोहर पाटील, राम कोळंबे, प्रकाश पालकर, जगदीश देशमुख, विनय वेखंडे, भानुदास पालकर, खेडकर, ॲड. पूजा सुर्वे, भारती पालकर, मधुरा चंदन, नमिता घारे, प्रमोद देशमुख, सोमनाथ पालकर, अतुल कडू, अशोक दिघे, आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## डम्पर बंद पडल्याने बोरघाटातील अमृतांजन पुल ते अंडा पॉईंटदरम्यान वाहतूक कोंडी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुबंई पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील अमृतांजन पुल ते अंडा पॉईट अशा ४ किमी अंतरावर सकाळी ११ वा सुमारास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याने द्रुतगती महामार्ग व जुना मुंबई पुणे महामार्ग ठप्प झाला होता. या मार्गावर तीन ते चार किमी वाहणांच्या रांगा लागल्या होत्या.

महामार्गावर कुठलाही अपघात नसताना वाहतूक कोंडी झाली होती. हीच स्थिती बुधवारी सायंकाळी ७ ते मध्यरात्री २ वा पर्यंत होती. दरम्यान बोरघाट वाहतूक पोलीसांनी मुंबई मार्गीकेवरुन मुंबई बाजुकडे जाणारी वाहतूक खंडाळा बोगद्याजवळ थांबवून पुणे व मुंबई मार्गीकेवरुन पुणे कडे जाणारी वाहतूक सुरू केल्याने बोरघाटात झालेला वाहनांचा जांगडगुत्ता सोडविण्यासाठी वाहतूक पोलीसांना १ तास झुंजावे लागले.

गुरुवारी सकाळी साडे आठच्या सुमारास खंडाळा हद्दीत पुणे मार्गीकेवर खंडाळा बोगद्याच्या २०० मीटर अंतरावर कोळसा वाहून नेणाऱ्या डम्परचा पाटा तुटल्याने हे वाहन बंद पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती

यादरम्यान पुणे दिशेला जाणाऱ्या गाड्यांची कोंडी झाल्याने दोन ब्लॉक घेण्यात आले.. व मॅजिक पॉईंट पर्यंत गेलेला बॅकलॉग बोरघाट चौकीपर्यंत आला होता..बंद पडलेले डम्पर दुरुस्तीसाठी २ तासानंतर दुरुस्त झाल्यावर. दुपारी ४ वा सुमारास वाहतूक सुरळीत चालू झाली.



राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

**नावात बदल**

माझे जुने नाव **कु. प्रभाबाई हासुराम घरत** असे होते. माझे जुने नाव बदलुन यापुढे मी **सौ. प्रभावती नरेंद्र ठाकूर** या नावाने ओळखली जाईन. माझे खरे व सत्यनाव **सौ. प्रभावती नरेंद्र ठाकूर** असे असून माझे नावे असलेले आधारकार्ड नं. ४७६७८८०२५१८८ व पॅनकार्ड नं. BJYPT3624H व मतदान ओळखपत्र ANR7707581 वर दाखल आहे.

प्रतिज्ञापत्र नं. २५५२०४१७२१२६८६०००२५१००

दिनांक : ०८/०४/२०२५

सही/-
**सौ. प्रभावती नरेंद्र ठाकूर**
पत्ता: घर नं. ९४, मु. करळ, पो. जे.एन.पी.टी,
ता. उरण, जि.रायगड. पिन नं.४००७०७

## कर्जतमध्ये महावीर जयंती साजरी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरांतील जैन बांधवांनी महावीर जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महावीरांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. यावेळी जैन बांधवांनी ’जिओ और जिने दो’ च्या घोषणांनी कर्जत शहर दणाणून सोडले होते. जैन बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. सा. दर्शना प्रभाश्रीजी, म. सा. च्या शिष्या सा. अचिंत्य प्रभाश्रीजी यांच्या मार्गदर्शन मिरवणूक काढनाथ आलीया मिरवणुकीत चौदा स्वप्नांच्या प्रतिकृतींचे आयोजन करण्यात आले होते. जैन मंदिरापासून मिरवणूक बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या वरून छत्री केंद्र मार्गे पुन्हा जैन मंदिराकडे आली. या मिरवणुकीत घोडे सुद्धा सहभागी करण्यात आले होते.

जैन समाजाचे अध्यक्ष अजित ओसवाल, मोहन ओसवाल, उमेदमल ओसवाल, अशोक ओसवाल, दिनेश जैन, रणजित जैन, सचिन ओसवाल, पप्पू परमार, पंकज परमार,अक्षय ओसवाल, रमेश ओसवाल, प्रकाश ओसवाल, किरण जैन, दिनेश सोलंकी, भरत सोलंकी, अरविंद जैन, भावना ओसवाल, संतोष ओसवाल, लता ओसवाल, नीता कंकारिया, सुरेखा ओसवाल, संगीता ओसवाल, जयश्री ओसवाल, सीमा ओसवाल, किर्ती ओसवाल, सुनीता ओसवाल, टीना ओसवाल आदींसह जैन बांधव भगिनी उपस्थित होत्या.

## पोलादपूरच्या तरूणाचा स्कूटर अपघातात मृत्यू; तिघे जखमी

**पोलादपूर: प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर तांबडभुवन येथील एका तरूणाचा सहकुटूंब ॲक्टिव्हा स्कूटरवरून प्रवास करताना आयशर टेम्पोने राँग साईडने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात स्कूटरला जोरदार धडक दिली. या अपघातात तरूणाचा मृत्यू झाला अन्य तिघांपैकी एका मुलीची प्रकृती चिंताजनक असून आई व मुलाची तब्येत स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील लोहारमाळ हद्दीतील मोरया ढाब्याजवळ पोलादपूरच्या दिशेने ॲक्टीव्हा स्कूटरवरून सुनील सुरेश पवार (वय४१), सुवर्णा सुनील पवार (वय ३९), श्लोक सुनील पवार (१३) आणि रिया सुनील पवार (१०) हे चार जणांचे कुटूंब बुधवारी रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास प्रवास करीत येत असताना पाठीमागून येणाऱ्या आयशर टेम्पो चालक अतुल अजित काळवणकर (वय ३५, मिठबाव,ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग) याने अतिवेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दूर्लक्ष करून डाव्या बाजूने राँग साईडने ओव्हरटेक करताना ॲक्टीव्हा गाडीच्या डाव्या बाजूला डिझेल टॅकजवळ ठोकर मारल्याने ॲक्टीव्हा चालक सुनील पवार याचा तोल गेला आणि तो आयशर टेम्पोच्या मागील टायरखाली आला. याच वेळी त्याची मुलगी रिया हिला जोरदार मार लागला आणि त्याची पत्नी आणि मुलगा यांना किरकोळ जखमा आणि मुकामार लागला. दोन्ही वाहनांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले.

सुनील पवार याची प्रकृती गंभीर असल्याने तातडीने माणगांव उपजिल्हा रूग्णालयामध्ये पाठविले तर लहान मुलीला कामोठेतील एमजीएम रूग्णालयामध्ये पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये चालक अतुल कालवणकर याच्याविरूध्दे गुन्हा दाखल करण्यात आला.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे वाघाची वाडी, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | खाते क्रमांक | आकार रू.पैसे. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १४/१ | ०-२०-०० | २४७ | ०.४० | श्री. संदिप मोहन पाटील |

पनवेल.
दिनांक : १०/०४/२०२५.

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
फोन ९८३३६३९२०६

## माथेरानच्या जंगलात प्राण्यांसाठी पाणवठे; वनविभागाचा स्तुत्य उपक्रम



**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थ हे घनदाट जंगलाने व्यापलेले असून या जंगलात मोठ्या प्रमाणावर वन्यप्राणी असून विविध जातींच्या पक्षांची संख्या सुद्धा भरपूर प्रमाणात आहे.आता सध्या ऐन उन्हाळ्यात वन्यजीव आणि पशु पक्षांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. याकरिता माथेरानमधील जंगलात वन विभागाच्या वतीने पाणवठे तयार करण्यात आले असून तेथे पशु पक्षी व वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था केली जात आहे.यामुळे आता गर्मीच्या महिन्यात येथील प्राणी,पशु,पक्षी यांच्यासाठी मोठी सोय झाली आहे.

माथेरान म्हणजे माथ्यावरील रान हे येथे सात चौरस किलोमीटर मध्ये पसरले असून माथेरान पर्यटनस्थळी मोठी वनसंपदा आहे.त्यामुळे येथील जंगलात प्राणी व पक्षी यांचे वास्तव्यदेखील मोठ्या प्रमाणात आहे.गर्मी मुळे जंगलातील प्राणी आणि पक्षी यांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याने पक्षी सतत ओरडत असल्याचे दिसून येतात तर काही वन्य प्राणी मानवी वस्तीकडे येऊ लागले असून काही दिवसांपूर्वी रानटी डुक्कर थेट लोकवस्तीकडे आले होते.हे लक्षात घेऊन माथेरान शहरातील वन विभागाने प्राण्यांची पाण्यासाठी धावपळ आणि पक्ष्यांची किलबिल थांबवण्यासाठी जंगल भागात पाणवठे निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

वन विभागाचे वन क्षेत्रपाल उमेश जंगम यांचे मार्गदर्शन घेऊन माथेरान येथील वनपाल राजवर्धन आढे यांनी जंगल भागात फिरून प्राण्यांसाठी पाणवठे कुठे बांधायचे याचा अभ्यास केला.त्यातून माथेरान वनविभागाने वन संरक्षण समितीसोबत जंगल भागातील माथेरान प्लाटो कंपार्टमेंट ४५० मध्ये रेसकोर्स भागातील विविध ठिकाणी पाणवठे तयार केले आहेत. तेथील रेसकोर्स तसेच बेलवेडीयर पॉईंट या परिसरात दोन तसेच अन्य जंगल भागात दोन असे चार पाणवठे तयार केले आहेत.

जंगल भागातील प्लेटो, टेरेस, चिल्ड्रन्स पार्क, रेसकोर्स येथील पाणवठे हे वन कर्मचारी यांनी त्या सर्व ठिकाणी श्रमदान करून निर्माण केले आहेत. त्यासाठी वनपाल आढे यांना वनरक्षक जयंत चेमटे, विवेक साळुंके, अनतेश्वर भंगे तसेच वन कर्मचारी काळूराम जामघरे,बबलू शिंगाडे यांनी मदत केली आहे.

**मध्य कोकण क्षत्रिय मराठा को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड**

कार्यालय-३ ओ, साईप्रसाद अपार्टमेंट, राजर्षी शाहू महाराज क्रॉस रोड, जूनी तेली गल्ली, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९. दूरध्वनी- अंधेरी ऑफिस-७०२१५५८५५९

शाखा-जय जिनेन्द्रा को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. ६ जेठाभाई लेन, कामगार आघाडी कार्यालय शेजारी, घाटकोपर (पू.) मुंबई-७७.

**मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.३२६६, दि.१९/०४/२०२२ रोजीचे संस्थेतील रिक्त पदे भरण्याबाबतचे परिपत्रक/आदेश.**

**-: नोटीस :-**

मध्य कोकण क्षत्रिय मराठा को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि., ३ ए, साईप्रसाद अपार्टमेंट, राजर्षी शाहू महाराज क्रॉस रोड, जुनी तुली गल्ली, अंधेरी (पूव), मुंबई-४०० ०६९ या संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), मुंबई यांचेकडील जा.क्र.१३०४, दिनांक ९/०४/२०२५ रोजीचे आदेशाने श्री. चंद्रशेखर डोंगरवार, सहकारी अधिकारी, श्रेणी-२ यांची आपल्या संस्थेच्या मतदार संघातील रिक्त पदे निवडणूक / नैमित्तीक रिक्त पदे संचालक मंडळाची विशेष सभा घेवून भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता अध्यासी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे आपल्या संस्थेच्या संचालक मंडळातील रिक्त पदे भरण्याकरीता अध्यासी अधिकारी यांचे उपस्थितीत आपल्या संस्थेची विशेष सभा बैठक आयोजित करण्यात येत आहे.

सबब आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदार गट ४ महिला राखीव गट १ या प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेचे कार्यालय या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेत हजर राहण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. सभेत नैमत्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील कार्यक्रमानूसार कामकाज करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | दुपारी ३.०० ते दुपारी ४.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छानननी | दुपारी ४.१० वाजता |
| ३ | वैद्य नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी ४.२० वाजता |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी ४.३० वाजता |
| ५ | अंतीम उमेदवाराची यादी जाहिर करणे | दुपारी ४.४० वाजता |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी ५.०० वाजता |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | सांयकाळी ६.०० वाजता |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषीत करणे | सांयकाळी ६.३० वाजता |

टिप : निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.
**(अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)**

**दिनांक : ११/०४/२०२५**
**ठिकाण : मुंबई.**

सही/-
**(विजय दरेकर)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे वाघाची वाडी, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | खाते क्रमांक | आकार रू.पैसे. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १४/१ | २-३३-०० | २०३ | ४.६१ | १) संदिप मोहन पाटील, २) मधुकर तातोबा कांबळे, ३) रजनी मधुकर कांबळे, ४) निशांत मधुकर कांबळे. |

**वरील सामाईक क्षेत्र २ -३३- ००, आकार ४.६१ श्री. संदिप मोहन पाटील यांचे मालकी हिश्याचे क्षेत्र ० -२१ -०० हे. आर. पॉ.**

पनवेल.
दिनांक : १०/०४/२०२५.

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
फोन ९८३३६३९२०६

# मोरा-मुंबई रो-रोच्या कामाला वेग

- डिसेंबर २०२५चा मुहूर्त
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचा नवा दावा

**उरण : रामप्रहर वृत्त**

मोरा बंदर ते मुंबई च्या भाऊचा धक्का दरम्यानच्या ७५ कोटी खर्चाच्या मोरा रो-रो सेवेचे काम काही तांत्रिक अडचणींमुळे लांबणीवर पडले होते, मात्र हे काम पुन्हा एकदा वेगाने सुरू करण्यात आले आहे. हे काम कोणत्याही परिस्थितीत डिसेंबर २०२५ ला पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.



बहुप्रतीक्षित असलेल्या मोरा मुंबई रो-रो सेवेचे काम काही तांत्रिक अडचणींमुळे लांबणीवर पडले होते. यातून मार्ग काढण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डा कडून देण्यात आली आहे. बोर्डाच्या अखत्यारितील मोरा-भाऊचा धक्का या सागरी मार्गावर रोरो सेवेचे काम सुरू आहे. ७५ कोटी खर्चाचे हे काम अनेक अडथळ्यांमुळे २०१८ पासून कासव गतीने सुरू आहे. मात्र मागील चार-पाच महिन्यांपासून कामाला वेग आला होता.

सातत्याने होणाऱ्या या जलमार्गाच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे. यातील रेवस जेट्टीच्या कामात पाच कोटींच्या खर्चात वाढ झाली आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून या जेट्टीचे काम करण्यात येत आहे. या जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे.

> **मोरा जेट्टीच्या उभारणीतील अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. त्यानंतर कामाला वेग आला असून येत्या डिसेंबर २०२५ पर्यंत जेट्टीचे काम पूर्ण करण्यात येईल.**
>
> **-सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड**

मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या रो रो मार्गावरील भाऊचा धक्का ही जेट्टी कार्यान्वित झाली आहे. मात्र मोरा जेट्टीचे काम सात वर्षांपासून रखडले आहे. हे काम रखल्याने ५० कोटींच्या कामाची रक्कम ७५ कोटींवर पोहचली आहे. तरीही जेट्टीचे काम अपूर्णच असून जेट्टी पर्यंत जाण्यासाठी मार्ग ही होऊ शकलेला नाही.

# वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व देखभाल-दुरुस्ती कामांना वेग

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण आणि भांडुप परिमंडलात वीज वितरण यंत्रणेच्या पावसाळापूर्व देखभाल-दुरुस्तीच्या कामांना वेग देण्यात आला आहे. या कामांमुळे पावसाळापूर्व वादळवारा व मान्सुनच्या सुरुवातीला खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याची तीव्रता कमी होण्यास मदत मिळेल. संबंधित भागातील वीज ग्राहकांना पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवून त्या-त्या भागात देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येत असून या कामांसाठी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

देखभाल-दुरुस्तीच्या कामातून वीज वितरण यंत्रणेची कार्यक्षमता व जीवनमान वाढण्यास मदत होते. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी साधारणत: एप्रिल आणि मे महिन्यात वीज वितरण यंत्रणेची कामे केली जातात. त्यानुसार कल्याण आणि भांडुप परिमंडलात यावर्षी



तापमानाचा पारा चाळीशी पार झालेला असतानाही महावितरणचे कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि कंत्राटदाराचे (एजन्सी) कामगारांनी रणरणत्या उन्हात देखभाल-दुरुस्तीची कामे केली आहेत. देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी विभागनिहाय इनपॅनलमेंट एजन्सीची (कंत्राटदार) नियुक्ती करण्यात आली आहे. महावितरणचे नियमित कर्मचारी, बाह्यस्त्रोत (कंत्राटी) कामगार आणि एजन्सीच्या कामगारांकडून एकत्रितपणे देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये वीज वितरण रोहित्र (डीपी), उपकेंद्र तसेच उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्यांची कामे तसेच वीज वितरण यंत्रणेत अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येते. सर्वेक्षणानंतर आवश्यक कामांची निवड करून स्वंयचलित एनडीएम प्रणालीत संबंधित काम व भागांची माहिती भरण्यात येते. त्यानुसार संबंधित भागातील वीज ग्राहकांना प्रणालीमार्फत वीज बंद ठेवण्यात येणाऱ्या कालावधीबाबत पूर्वकल्पना देणारे मेसेज त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठवले जातात. कल्याण व भांडुप परिमंडलातील ग्राहकांनी देखभाल-दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## निवडक

### बारचे अतिक्रमण हटवले

**नवी मुंबई :** सानपाडा सेक्टर ५ येथे उभारलेला संपूर्ण बार अनधिकृत जागेवर उभारल्याचे निष्पन्न झाले आहे. सानपाडा सेक्टर ५ येथील भुखंड क्रमांक ५२३ हा सिडकोचा भुखंड आहे. गेली दोन दशकांपेक्षा अधिक काळ यावर मयूर बार उभारण्यात आला होता.त्यानिमित्ताने येथे बांधकाम करण्यात आले होते. सिडकोने संपूर्ण बार अनधिकृत ठरवत उद्ध्वस्त केला आहे.

### हनुमान कोळीवाडा येथे राम नवमी

**उरण :** तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथे श्रीरामाचे



जन्मोत्सव झाला. राम मंदिरात विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ, ग्रामस्थ हनुमान कोळीवाडा, शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटना, महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रेडिशनल फिश वर्कर्स युनियन, पारंपारिक मच्छिमार सामाजिक बचाव व कृती समिती, सामूहिक वन हक्क समिती शेवा कोळीवाडा, श्री हनुमान कोळीवाडा मच्छिमार विकास संस्था मर्यादित आदींनी मेहनत घेतली.

### ब्लड डिसऑर्डर क्लिनिक लाँच




**नवी मुंबई :** नवी मुंबईमध्ये ब्लड डिसऑर्डर क्लिनिक लाँच केले. हे अग्रगण्य केंद्र रक्त-संबंधित आजारांचे निदान, उपचार आणि व्यवस्थापन करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. फोर्टिस हॉस्पिटल्स मुंबईच्या फोर्टिस इन्स्टिटयूट ऑफ ब्लड डिसऑर्डर्सचे संचालक डॉ. सुभप्रकाश सन्याल यांच्या नेतृत्वात या युनिटचे फोर्टिस हॉस्पिटल्सचे महाराष्ट्रातील बिझनेस हेड डॉ. एस. नारायणी आणि फोर्टिस हिरानंदानी हॉस्पिटल वाशीचे फॅसिलिटी डायरेक्टर नितीन कमारिया यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.







**पनवेल :** महापालिकेचे माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ आणि अजय बहिरा यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, नितीन पाटील, कामगार नेते जितेंद्र घरत, राकेश भुजबळ, मच्छिंद्र पाटील, नितीन भुजबळ, किशोर शिंदे, क्रांती कुमार चितळे, पप्पू साळवी, अजित लोंढे, चंद्रकांत पट्टेबहादूर, आकाश गुंजाळ, संदेश ढवळे, जगदीश शिर्के आदी उपस्थित होते.

# विवेकानंद संकुलात विद्यार्थ्यांना आदर्श व्यक्तिमत्त्वाची ओळख

**नवी मुंबई : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ संचालित प्राथमिक विद्यालय विवेकानंद संकुल सानपाडा या शाळेमध्ये इयत्ता सातवीच्या शुभेच्छा समारंभ अतिशय वेगळ्या प्रकाराने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रसिद्ध उद्योजक हरीश इंगवले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांसमोर भावी काळामध्ये काही आदर्श निर्माण व्हावा यासाठी प्रमुख पाहुणे यांची मुलाखत घेण्यात आली मुलाखत संतोष मिसाळ यांनी घेतली.

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत यांची विद्यार्थ्यांना त्यांनी आपल्या जीवन प्रवासातून माहिती दिली. पारंपारिक पद्धतीने होणाऱ्या शुभेच्छा समारंभामध्ये यावर्षी उद्योजक आपल्या भेटीला अशा प्रकारचा एक नवीन उपक्रम शाळेने राबवून विद्यार्थ्यांच्या समोर उद्योजक होण्यासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्वाची ओळख मुलांना करून दिली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रेरणा घेऊन नवीन उद्योजक निर्माण होतील अशा प्रकारची अपेक्षा प्रमुख पाहुणे हरीश इंगवले यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका ऋतुजा गवस यांनी प्रास्ताविक सादर केले. संतोष मिसाळ यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# अनिकेत म्हात्रे यांची नवी मुंबई युवासेना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

काँग्रेसमधून नुकतेच शिवसेनेत आलेले माजी प्रदेश युवा उपाध्यक्ष अनिकेत म्हात्रे यांची शिवसेनेने नवी मुंबई युवासेना जिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र अनिकेत म्हात्रे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या वेळी खासदार नरेश म्हस्के, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच शिवसेना व युवासेनेचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



काँग्रेसमध्ये असताना अनिकेत म्हात्रे यांनी युवकांची फौज निर्माण केली होती. तसेच अनेक आंदोलने त्यांनी राबवली होती. शिवसेनेचे युवक जिल्हाप्रमुखपद मिळाल्याने शिवसेनेला युवकांची ताकद लाभणार आहे.

अनिकेत म्हात्रे यांना नियुक्ती पत्र सुपूर्द करताना, ऐरोली विधानसभा जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, बेलापुर विधानसभा जिल्हाप्रमुख किशोर पाटकर, माजी नगरसेवक मनोज हळदणकर तसेच अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# गव्हाण कोपरमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत माउली हरिपाठ मंडळ गव्हाण कोपर यांच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला गुरुवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.

हा सोहळा गव्हाणमधील श्री शांतादेवी मंदिरात १० ते १६ एप्रिलपर्यंत रंगणार आहे. सकाळी अंकित घरत आणि तन्मयी घरत यांच्या हस्ते मूर्तीला अभिषेक करण्यात आला आणि त्यानंतर सप्ताहाचा विधिवत प्रारंभ झाला. या वेळी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, अरुण घरत गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, गव्हाण कोळी समाज अध्यक्ष महादेव कोळी, आयोजक वसंतशेठ पाटील, हभप शिवाजी महाराज पाटणकर, हभप विलास म्हात्रे, कोळी गुरुजी, श्री शांतादेवी मंदिर कमिटीचे अध्यक्ष अशोक कडू, हभप भास्कर महाराज कोळी, हभप नंदाठाकूर महाराज, हभप शरद महाराज, हभप कृष्णा म्हाराज, हभप अविनाश पाटील, हभप कैलाश देशमुख, हभप रसिका कोळी, हभप सविता म्हात्रे, हभप शैला ठाकूर, हभप शशिकला कोळी, हभप मिनाक्षी म्हात्रे, हभप हिराबाई, हभप मंजुळा भगत, हभप भारती देशमुख, हभप अनुसया घरत यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्ताहभर चालणाऱ्या या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये हरिपाठ, प्रवचन, सामुदायीज हरिपाठ, प्रवचन आणि कीर्तन होणार आहे. तसेच, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायणही केले जाणार आहे.

# आनंदनगरच्या पोस्ट कार्यालयाचे जेएनपीटी वसाहतीमध्ये स्थलांतर

**उरण : प्रतिनिधी**

शहरातील आनंदनगर येथील पोस्ट कार्यालय हलवून ते जेएनपीटी कामगार वसाहतीत सुरू करण्यात आला आहे. शहरातील हे कार्यालय हलविण्यात आल्याने जेष्ठ नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या पोस्ट कार्यालयात ये जा करण्यासाठी सहा किलोमीटर अंतर पार करावे लागत आहे. उरण येथील २१ हजारपेक्षा अधिक ग्राहक असलेल्या पोस्ट कार्यालयात मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिकांचा समावेश आहे.

पोस्टातून पैसे भरणे आणि काढणे अशी नित्याची कामे केली जातात. सध्याच्या बँक घोटाळे आणि आर्थिक घोटाळ्यामुळे नागरिकांचा कल हा पोस्टाकडे आहे. त्याचप्रमाणे पोस्टकडून ही नागरिकांसाठी गुंतवणूकीच्या विविध योजना राबविण्यात येत आहे, मात्र उरण सारख्या वाढत्या शहरात पोस्ट विभागाला जागा उपलब्ध होत नसल्याने शरीरातील पोस्ट कार्यालय शहरा बाहेर हलविण्यात आले आहे. शहरातील पोस्ट कार्यालय शहरा बाहेर नेल्याने ज्येष्ठ नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे प्रवासासाठी अधिकचा भुर्दंड सोसावा लागत असल्याचे जिल्हा मुख्यालय आणि उरण नगर परिषदेच्या माध्यमातून पुन्हा शहरात पोस्ट कार्यलय सुरू करावे असे मत उरण मधील जेष्ठ नागरिक सूर्यकांत दांडेकर यांनी व्यक्त केले आहे. तर उरणचे पोस्ट कार्यालय ज्या जागेत होते. ती इमारत धोकादायक ठरविण्यात आली आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणाने हलविण्यात आले आहे. मात्र पुनः एकदा हे कार्यालय शहरात सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पोस्ट अधिकारी प्रशांत म्हात्रे यांनी दिली.

# रोह्यात ठाकरे गटाला धक्का; शिवसेना तालुका प्रमुख समीर शेंडगेंचा राजीनामा

## १३ तारखेला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) मध्ये करणार प्रवेश



**धाटाव , रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात शिवसेना उबाठा गटाला मोठा धक्का बसणार असून शिवसेना तालुकाप्रमुख समीर शेडगे त्यांच्या सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी (अजित पवार) गटात पक्ष प्रवेश करणार आहेत. समीर शेडगे यांनी खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आपण राष्ट्रवादी (अजित पवार गट ) पक्षात जाणार असल्याचे अधिकृतरित्या रोहा शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

या पत्रकार परिषदेत समिर शेडगे यांनी १३ एप्रिल रोजी आपण पक्षप्रवेश करणार असून या पक्षप्रवेशाच्यावेळी माझे सहकारी सोबत असणार असल्याचे सांगितले. प्रवेश करताना कोणती अट आपण खासदार सुनील तटकरे यांच्याशी चर्चा करताना घातली नसल्याचे यावेळी आवर्जून सांगितले. खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास असून त्यांच्या नेतृत्वाखाली पुढील राजकीय कारकीर्द कडे आपण वाटचाल करणार असल्याचे सांगितले.

यावेळी समीर शेडगे यांनी गेले आठ वर्ष आपणास शिवसेना पक्षाने भरभरून दिले असल्याचे सांगितले. शिवसेना पक्षात असताना पक्ष संघटना आपण चांगली बांधली आहे. मी कोणतीही टीकाटिप्पणी करणार नाही. कोणत्याही वाद कटूता माझ्या मनात शिवसेनेबद्दल नाही. मी माझ्या पदाचा राजीनामा पक्षश्रेष्टीकडे पाठवला आहे. मी माझ्या वैयक्तिक व राजकीय कारणास्तव राष्ट्रवादी अजित पवार गटात जात असल्याचे यावेळी आवर्जून सांगितले.

यावेळी शिवसेना उबाठाचे, महादेव साळवी, निता हजारे, हर्षद साळवी, आदित्य कोंडाळकर, बिलाल मोर्बे कर, मजहर सिध्दीकी, रुपेश नांदगावकर उपस्थित होते.

# माथेरान शहरात पुन्हा आगीची घटना

**माथेरान: बातमीदार**

माथेरान शहरात पुन्हा आगीची घटना घडली असून शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मेजवानी हॉटेलच्या वरील मजल्यावर असलेल्या एका रूम मध्ये शॉट सर्किट मुळे आग लागल्याची घटना घडली असून रूम मधील सामान जळून खाक झाले आहे.

माथेरान शहरात आगीच्या घटना सतत घडत असून बुध दि.९ रोजी सायं.माथेरान शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या श्रीराम मंदिर समोरील मेजवानी हॉटेलच्या वरील मजल्यावर असलेल्या एका रूमला शॉट सर्किट मुळे आग लागल्याची घटना घडली. सिलिंग फॅन सुरू ठेवल्याने शॉट सर्किट होऊन आग लागली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.रूम मधून धूर येत असल्याचे पाहून नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

शेजारील दुकानदार मालक यतिश तावडे यांनी मोटारीच्या साहाय्याने आपल्या दुकानावर असलेल्या पाण्याच्या टाकीतून पाणी उपलब्ध करून दिल्यामुळे स्थानिक तरुण शशिकांत नायक याने आग लागलेल्या रूमच्या खिडकीची काच तोडून पाणी मारण्यास सुरवात केली.तात्काळ आग आटोक्यात येऊन पुढील मोठा अनर्थ टळला.यावेळी मेजवानी हॉटेल व्यवस्थापकांनी सांगितले की आम्ही अग्निशामक बंब गाडी साठी फोन केला होता मात्र एक तास उलटला तरी अग्निशामक बंब गाडी घटनास्थळी पोहचली नव्हती.

# बोरघाटात डिझेल वाहून नेणारा पीकअप टँकर उलटला

**खोपोली– प्रतिनिधी**

मुबंई पुणे जुन्या महामार्गावर बोरघाटात खिंडीत डिझेल वाहून नेणाऱ्या पीकअप टँकरचा ब्रेक फेल झाल्याने पलटी झाला

मुबंई पुणे जुन्या महामार्गांवरून पिकअप टँकर चालक हुकूमसिंग कुंदन राठोड वय ३२ हे( शिवशंकर पेट्रोल पंप हलीवली कर्जत ) आपला डिझेल टँकर पुण्याहून खोपोली कडे बोरघाटातून येत असताना त्याचा ब्रेक फेल झाल्याने



चालकाचे त्यावरील नियंत्रण सुटल्याने खिंडीच्या डोंगरावर जोरदार धडक देउन टँकर पलटी झाला, या अपघाताता कोणालाही दुखापत झाली नाही डिझेल रस्त्यावर सांडले अपघात टाळण्यासाठी पडलेल्या डिझेलवर माती टाकण्यात आली,

# नागावला कचरा व्यवस्थापनासाठी तीन प्रमुख संस्था एकत्र

**रेवदंडा: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नागाव गाव, ज्याचे नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यटन स्थळ म्हणून मोठे महत्त्व आहे, त्याच्या कचरा व्यवस्थापनासाठी तीन प्रमुख संस्थांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, तसा करारनामा आज करण्यात आला आहे . नागाव ग्रामपंचायत, आम्ही संस्था आणि वत्सा फाउंडेशन या तीन संघटनांनी मिळून गावातील कचरा व्यवस्थापनासोबतच पर्यावरणीय शुद्धता, ग्रामस्थांचे आरोग्य आणि पर्यटन क्षेत्राचा संतुलित विकास साधण्याचा निर्धार केला आहे.



नागाव गावातील वाढत्या पर्यटक संख्येचा विचार करता, कचरा व्यवस्थापन एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. या तीन संस्थांनी एकत्र येऊन एक व्यापक योजना तयार केली आहे, ज्यामध्ये पर्यावरण, आरोग्य आणि पर्यटन या तीन महत्त्वाच्या बाबींचे संतुलन साधले जाईल. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे पर्यटकांद्वारे निर्माण होणारा कचरा योग्य पद्धतीने संकलित करणे आणि त्याचा निपटारा करणे, तसेच ग्रामस्थांचे आरोग्य आणि गावाच्या पर्यावरणाचे संरक्षण करणे.

आम्ही फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक रोजलिन परेरा यांनी सांगितले, आम्ही फाउंडेशन कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रात स्थानिक समुदायांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम करते. नागाव गावात आम्ही कचरा संकलन आणि पुनर्वापराच्या विविध पद्धती लागू करू इच्छितो. यासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

वत्सा फाउंडेशनचे संचालक , रोहित वत्सा यांनी सांगितले, गावातील कचरा व्यवस्थापनावर विशेष भर देत, आम्ही पर्यावरणीय शुद्धता राखण्यासाठी पुनर्वापर आणि रिसायकलिंगच्या पद्धती वापरणार आहोत. याचा उद्देश गावाच्या सौंदर्याची शुद्धता राखणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे आहे.

नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच, हर्षदा मयेकर यांनी सांगितले, गावातील कचरा व्यवस्थापनासाठी आमच्याकडून अशा प्रकारचा पुढाकार घेण्यात आला आहे. आपण ग्रामपंचायतीमार्फत मागितलेले सहकार्य सर्व ग्रामस्थांकडून मिळेल असा विश्वास मला वाटतो . आमच्या योजनेत स्थानिक नागरिकांना पर्यावरणाच्या महत्त्वाची जाणीव करून दिली जाईल आणि त्यांना कचऱ्याच्या निपटारणाच्या योग्य पद्धती शिकवले जातील.

योजना अंतर्गत, नागाव गावात कचरा संकलन केंद्रे, रिसायकलिंग यंत्रणा आणि जैविक कचऱ्याचे पुनर्वापर यंत्रणा स्थापित करण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त, पर्यटन स्थळांवर विशेष सफाई मोहिमा, कचरा न फेकण्याबाबत शिबिरे आणि पर्यावरण संरक्षणासाठी लोकांची सक्रिय सहभागिता सुनिश्चित केली जाईल.

स्वच्छता आणि पर्यटनाचा समतोल: नागाव गावाच्या पर्यटन क्षेत्रासाठी या योजनेचे महत्त्व अनन्य आहे. स्वच्छता आणि पर्यावरणीय शुद्धता राखल्यास अधिक पर्यटक आकर्षित होऊ शकतात. यामुळे गावाच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक प्रभाव पडेल आणि स्थानिक नागरिकांचे जीवनमान सुधारेल.

या तीन संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे, नागाव ग्रामपंचायतीच्या कचरा व्यवस्थापनाचे भविष्य उज्ज्वल दिसते. या उपक्रमामुळे पर्यावरणीय शुद्धता, पर्यटनाच्या वृद्धी आणि ग्रामस्थांच्या आरोग्याचे रक्षण साधता येईल. एकत्र येऊन या संस्थांनी नव्या पिढीसाठी एक आदर्श उभा केला आहे.

# रायगड जिल्ह्यात भगवान महावीर जयंती उत्साहात

**माणगाव :** माणगावात जैन संघटनेतर्फे भगवान महावीर जयंती गुरवार दि.१० एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात माणगाव शहरातील जैन बांधव – भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त शहरातून भगवान महावीर यांच्या प्रतिमेची मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. कचेरी रोड माणगाव येथील जैन मंदिरापासून या मिरवणुकीला सुरवात होऊन मुंबई – गोवा महामार्गावरून बालाजी कॉम्पलेक्स येथून वळसा घेऊन पुन्हा जैन मंदिरा जवळ मिरवणुकीची



उत्साहात सांगता करण्यात आली.

यानंतर जैन बांधवानी माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रम केंद्र उतेखोल येथील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. त्यानंतर माणगाव येथील राजस्थान कॉलनीत सायंकाळी भक्ती संध्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



**रेवदंडा :** रेवदंडा येथे भगवान महावीर जन्मकल्याणक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. रेवदंडा येथील जैन मंदिरातून भगवान महावीरांची प्रतिमा सुवर्ण रथात विराजमान करण्यात आली येवून भव्य मिरवणूक रेवदंडा जैन मंदिर ते पारनाका व पारनाका येथून जैन मंदिर अशी फिरविण्यात आली. यावेळी ढोल ताश्याचा गजर तसेच बेंजो पथकासह मिरवणूकीस उत्साह दिसून आला. यावेळी मोठया संख्येने जैन समाज बांधव व भगिनी सहभागी झाले होते. महावीर जन्मकल्याणक दिनाचे निमित्ताने रेवदंडा जैन मंदिरात अभिषेक कार्यक्रम, पुजा,भक्ती संध्या,आरती आदी विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते.

**मुरुड :** जैन धर्मियांचे २४ वे तिर्थनकर प्रभु भगवान महावीर यांची जयंती मुरुड शहरात उत्साहात संपन्न झाली.जैन बांधवांनी सोनेरी रथामध्ये महावीर भगवान यांची स्वर्ण प्रतिमेची ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढ्ली.भगवान महावीर स्वामी यांनी त्याग, करुणा,अहिंसा या मार्गाचा अवलंब करून मानवी जीवन सुखी करण्याचा महत्वपूर्ण संदेश दिला होता.भूतलावरील कोणत्याही प्राण्यास इजा पोहचवू नका,मत्सर बाजूला ठेवा,सर्वांविषयी चांगले विचार बाळगून संकटात सापडलेल्या मदतीचा हात द्या असा मोलाचा संदेश भगवान महावीर स्वामी यांनी देऊन सर्वसामान्य जनतेला सुखाचा व शांतीचा संदेश दिला होता.

जैन समुदायासाठी महावीर जयंती अत्यंत महत्त्वाची असते. हा दिवस ते जैन धर्माचे महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतात. ते शुक्ल पक्षामध्ये चैत्र महिन्याच्या तेराव्या दिवशी जन्मले होते. जैन धर्मातील महान तीर्थंकराचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती साजरी केली जाते. जैन लोक आनंद आणि उत्साहात हा दिवस साजरा करतात.या दिवशी जैन मंदिरात जाऊन त्यांच्या समुदायासाठी भगवान महावीर यांनी केलेल्या योगदानाचे स्मरण करतात आणि त्यांची शिकवण नव्या पिढीला देत असतात.

गुरुवारी सकाळी जैन मंदिरापासून भगवान महावीर यांच्या प्रतिमेची रथामधून मिरवणुक काढण्यात यावेळी जैन बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. जैन मंदिरापासून निघालेली मिरवणूक बाजारपेठेतून , आझाद चौकातुन पुन्हा जैन मंदिराकडे आली. जैन बंधु भगिनी यांनी बॅजोच्या तालावर गरबा डान्स करत मिरवणुकीची शोभा वाढवली.जैन बंधु कडुन येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना बुंदीचे लाडू म्हणून प्रसादाचे वाटप करण्यात येत होते.

सदर कार्यक्रमास जैन समाज अध्यक्ष हसमुख जैन ट्रस्टी अशोक जैन, अजय जैन,गौतम जैन,सचिन शहा,भावेश शहा,परेश शहा,गौतम जैन, कीर्ती शहा,प्रमुख कार्यकर्ते अमित जैन, सन्नी जैन, आनंद जैन, महेंद्र गांधी,जैनम जैन सर्व जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# उष्णतेच्या तीव्रतेने बर्फाची मागणी वाढली

**खोपोली: प्रतिनिधी**

उन्हाची दाहकता निर्माण झाल्यामुळे ,वातावरणात उष्णता जाणवू लागल्याने अंगाची लाहीलाही होऊ होत आहे.यामुळे प्रत्येक जण थंडाव्याच्या शोधण्यासाठी झाडाचा किंवा थंडगार ज्यूस चा आधार घेत असल्याचे दृश्य तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

यामुळेच बर्फाच्या मागणीत विक्रमी वाढ झाली असून अनेकांना यामुळे हंगामी रोजगाराच्या संधीसुद्धा मिळत आहे. रणरणत्या उन्हामुळे प्रत्येक नागरिक गर्मीने त्रस्त असून दुपारच्या वेळी थंडपेयाकडे आकर्षित होत आहेत.उष्णतेचा वाढता प्रभाव यामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत असताना,साहजिकच नागरिक थंड पेयाकडे आकर्षित होत आहेत. थंडपेयासाठी बर्फाची गरज भासत असून यामुळेच बर्फाच्या मागणीत वाढ झाली आहे. शहरातून जवळपास अंतरापर्यंत बर्फ पुरवठा केला जात आहे. यामुळे साहजिकच वाहतूक, विक्री आणि तयार होणार्या वस्तूपासून हंगामी रोजगार उपलब्ध झाला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत बर्फाला मागणी असल्याने आर्थिक उलाढालही मोठ्या प्रमाणावर होत आहे. बर्फाची मागणी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने हॉटेल, समारंभ, रसवंतीगृह, ज्युससेंटर, आदी ठिकाणी मोठया प्रमाणात बर्फाचा वापर होत आहे.

# ओल्या काजूगरांची किंमत आवाक्यात; खवय्यांची खरेदीसाठी लगबग



**पाली : प्रतिनिधी**

ओले काजू गर म्हटले की सगळ्यांच्याच जिभेला पाणी सुटते. सध्या जिल्ह्यात या ओल्या काजूगराचा हंगाम बहरला आहे. त्यामुळे बाजारात मुबलक प्रमाणात आणि परिपक्व ओले काजूगर उपलब्ध होत आहेत. तसेच मागील महिन्यापेक्षा या महिन्यात काजूगर निम्म्याने स्वस्त झाले आहेत. परिणामी खवय्यांची खरेदीसाठी लगबग सुरू आहे. रायगड जिल्ह्यात येणारे पर्यटक देखील आवर्जून काजुगर खरेदी करतात

मागील महिन्यात असलेल्या दरापेक्षा आताचा दर खूप कमी झाला आहे. मागील महिन्यात जवळपास तीनशे ते चारशे रुपये शेकड्याने मिळणारे काजूगर आता २०० ते १५० रुपये शेकड्याने भेटत आहेत. तर ५० रुपयांना एक वाट्याने मिळणारे अर्धे काजूगर आता ५० रुपयांना दोन वाटे मिळत आहेत.काजुचे फळ तयार होण्यापुर्वी येणारी



बी काढून त्यातील गर काढला जातो. त्याची भाजी करुन खाल्ली जाते. आदिवासी महिला हा रानचा मेवा मुबलक प्रमाणात विकायला घेवून येत आहेत.

जिल्ह्यात डोंगराळ भाग व जंगलामध्ये काजुची झाडे विपुल प्रमाणात आहेत. तसेच अनेक बागायतदारांच्या स्वतःच्या खाजगी काजुच्या बागा देखिल आहेत. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून या झाडांवर काजुच्या बिया येवू लागल्या आहेत. आणि या काजुच्या बिया तोडून काजूगर आदिवासी महिला बाजारात विकण्यासाठी घेवून येत आहेत. श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, महाड, अलिबाग यासह इतर तालुक्यात काजूगर शेकड्याने मिळतात. तर रोहा, सुधागड आदी तालुक्यात अर्धे काजूगर वाट्यावर मिळतात. अगदी जून महिन्यापर्यंत ओल्या काजुच्या बियांचा हंगाम सुरु असतो. काजुच्या बिया विकून आदिवासींच्या हाती चांगले पैसे देखील मिळतात. पण यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते.

काजूगर वेगवेगळ्या प्रकारे खाल्ले जातात. काजुच्या बियांचा रस्सा किंवा सुकी भाजी करुन खाल्ली जाते. काजूगराचा पुलाव व बिर्याणी देखील केली जाते. तसेच मटन, मच्छी, व सुक्या मासळी मध्ये टाकून सुद्धा काजुगर खाल्ले जातात. अशा या चविष्ट आणि स्वादिष्ट काजूगर जेवणाची लज्जत वाढवितात.

### *काजूगर काढण्यासाठी मेहनत आणि हातांची दुरवस्था*

***दुर्गम, डोंगराळ भागात आणि जंगलात काजुच्या बिया काढण्यासाठी जावे लागते. आदिवासी बांधव अनवाणी उन्हातान्हात बिया काढण्यासाठी जातात. या बियांना मोठ्या प्रमाणात चिक असतो. त्यामुळे त्यांचे हात चिकामुळे पुर्णपणे खराब होतात. अशा प्रतिकुल परिस्थितीमध्ये आदिवासींना बिया काढून विकाव्या लागतात. शासनाकडून त्यांना हातमोजे देणे तसेच सहाय्य करणे गरजेचे आहे.***

# ऑलिम्पिकमध्ये १२८ वर्षांनी क्रिकेटचा समावेश

## टी-२० फॉरमॅटमध्ये रंगणार सामने

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑलिम्पिक २०२८ मध्ये क्रिकेटचा अधिकृत समावेश करण्यात आला असून ही घोषणा मुंबईत पार पडलेल्या आयओसीच्या १४१ व्या अधिवेशनात झाली. २०२८ च्या लॉस एंजल्स ऑलिम्पिकपासून क्रिकेटचा समावेश केला जाणार आहे. आयसीसी क्रमवारीतील टॉपच्या सहा संघांना सहभागी होता येणार आहे. ऑलिम्पिकमध्ये टी-२० फॉरमॅटमध्ये क्रिकेटचे सामने होईल. ऑलिम्पिकमध्ये महिला आणि पुरुष अशा दोन वर्गात क्रिकेटचे सामने खेळवले जाईल. प्रत्येक संघात १५ खेळाडूंचा समावेश असणार आहे. १२८ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये पुन्हा क्रिकेट खेळले जाणार आहे.

अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेटच्या समावेशावर शिक्केमोर्तब झाले असून, २०२३ मध्येच आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक असोसिएशनने याला मान्यता दिली होती. १९०० मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचा समावेश होता, परंतु त्यानंतर झालेल्या



स्पर्धांमधून क्रिकेट वगळण्यात आले होत, पण आता पुन्हा एकदा समावेश केल्याने, तब्बल १२८ वर्षांनी ऑलिम्पिकमध्ये चौकार आणि षटकारांची आतषबाजी पाहायला मिळणार आहे.

१९०० मध्ये झालेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये फ्रान्स आणि ग्रेट ब्रिटन फक्त या दोन संघांनीच या खेळात भाग घेतला होता. ही स्पर्धा फक्त पुरुष संघांमध्ये झाली आणि ग्रेट ब्रिटनने सुवर्णपदक जिंकले होते.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक असोसिएशनने आता स्पष्ट केले आहे की २०२८ च्या एलए ऑलिंपिकमध्ये पुरुष आणि महिलांचे प्रत्येकी ६ संघ क्रिकेटमध्ये सहभागी होतील. हे सामने टी-२० आंतरराष्ट्रीय स्वरूपात खेळवले जातील.

विशेष म्हणजे, २०२८ च्या एलए ऑलिंपिकमध्ये फक्त सहा पुरुष आणि सहा महिला संघ भाग घेणार असल्याने, पात्रता स्पर्धा क्रिकेट खेळणाऱ्या अव्वल देशांमध्ये होण्याची अपेक्षा आहे. नियमित आयसीसी स्पर्धांपेक्षा वेगळे, पहिल्या तीन संघांसाठी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके असतील, त्यामुळे सहा सहभागी संघांपैकी तीन संघांना पदके मिळतील.

दरम्यान, ऑलिम्पिकची पात्रता फेरी कशी होणार हे अद्याप स्पष्ट झाले नाही. परंतु पुरुष गटात भारत, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका यासारख्या दिग्गज संघांचा समावेश असण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे, महिला संघांनाही पात्रता मिळविण्यासाठी कठीण स्पर्धेचा सामना करावा लागेल. यामध्ये इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, भारत, वेस्ट इंडिज, न्यूझीलंड, पाकिस्तान महिला आणि श्रीलंका या संघांमध्ये चुरस पाहायला मिळेल.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळाने क्रिकेटसाठी ९० खेळाडूंचा कोटा मंजूर केला, ज्यामुळे सहभागी होणाऱ्या संघांना या सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची निवड करता येणार आहे. ऑलिंपिकसाठी पात्रता निकष अद्याप जाहीर झालेले नाहीत, परंतु अमेरिका यजमान असल्याने त्यांना थेट पात्रता मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पाच जागा रिक्त राहतील. ऑलिंपिकसाठी पात्रता रँकिंगद्वारे निश्चित केली जाऊ शकते, म्हणजेच अव्वल पाच संघ आणि यजमान अमेरिका ऑलिंपिकसाठी पात्र ठरतील.

आगामी ऑलिंपिक गेम्समध्ये क्रिकेटसह पाच नवीन खेळांचा समावेश झाला आहे. आयओसीने २०२३ मध्ये बेसबॉल/सॉफ्टबॉल, फ्लॅग फुटबॉल, लॅक्रोस आणि स्क्वॅशसह क्रिकेटचा समावेश करण्यास मान्यता दिली होती.

# गुजरातचा सलग चौथा विजय

## राजस्थानचा केला दारूण पराभव

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्स संघाने राजस्थान रॉयल्सचा ५८ धावांनी मोठा पराभव केला आहे. या विजयासह गुजरात टायटन्सने सलग चौथा सामना जिंकला आहे. या विजयासह गुजरातचा संघ आयपीएलल २०२५ च्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. गुजरातच्या संघाने अष्टपैलू कामगिरी करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला आणि नंतर झटपट विकेट घेत राजस्थानला पराभवाचं पाणी पाजलं.

गुजरात टायटन्सने उत्कृष्ट गोलंदाजी करत राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांना मोठी भागीदारी रचण्यापासून दूर ठेवले आणि ठराविक अंतराने विकेट घेतले. याचे श्रेय गोलंदाजांबरोबर संघाचे कोच आशिष नेहरा यांना देखील जाते. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २१७ धावांचा डोंगर उभारला. तर प्रत्युत्तरात राजस्थान संघाला २०० धावांचा टप्पाही गाठू दिला



नाही. राजस्थानचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला.

गुजरातने या सामन्यात चतुराईने गोलंदाजी करत राजस्थानच्या फलंदाजांना मोठ्या खेळी खेळण्याची संधी दिली नाही. प्रसिध कृष्णाने उत्कृष्ट गोलंदाजी करत ३ विकेट्स घेतल्या आहेत. तर राशिद खान आणि साई किशोर यांना २ विकेट्स मिळाले. याशिवाय सर्व गोलंदाजांनी १-१ विकेट्स मिळाले.

राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. गुजरातची सुरूवातही शुबमन गिलच्या विकेटमुळे डगमगली. पण साई सुदर्शनने एका टोकाकडून धुव्वाधार खेळी केली. तर त्याला संघातील इतर फलंदाजांनी चांगली साथ दिली. साईने ५३ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांसह ८२ धावा केल्या. जोस बटलर आणि शाहरूख खानने प्रत्येकी उत्कृष्ट ३६ धावांची खेळी केली. तर राहुल तेवतियाने २४ धावांची तर राशिद खानने झटपट १२ धावांची खेळी केली आणि संघाला ६ बाद २१७ धावांपर्यंत नेले.

# साई सुदर्शनने घडवला इतिहास

## आयपीएलमध्ये ‘ही’ कामगिरी करणारा भारताचा पहिला फलंदाज

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्स संघाने साई सुदर्शनची ८२ धावांची उत्कृष्ट खेळी आणि कमालीच्या गोलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्स संघावर मोठा विजय मिळवला. गुजरातने आपल्या घरच्या मैदानावर राजस्थानचा ५८ धावांनी पराभव केला आहे. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना २१७ धावांची मोठी धावसंख्या उभारली होती, ज्यामध्ये साई सुदर्शनच्या खेळीचं मोठं योगदान आहे. दरम्यान त्याने या सामन्यात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

साई सुदर्शनने आयपीएलमध्ये इतिहास रचला आहे. या स्पर्धेत आतापर्यंत कोणताही भारतीय फलंदाज जे करू शकला नाही, ते आता साई सुदर्शनने करून दाखवलं आहे. यापूर्वी एबी डिव्हिलियर्सनेही



फक्त आरसीबीकडून खेळताना असा पराक्रम केला होता.

साई सुदर्शन हा एकाच आयपीएल मैदानावर सलग पाच वेळा ५० पेक्षा जास्त धावा करणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर, साई सुदर्शनने २०२४ मध्ये ५० पेक्षा जास्त धावांचे सलग दोन डाव खेळले. त्यानंतर, या वर्षीही त्याने याच मैदानावर सलग तीन वेळा ५० पेक्षा जास्त धावांचा डाव खेळला आहे. यापूर्वी कोणत्याही भारतीय फलंदाजांनी अशी कामगिरी केली आहे. २०१८ ते २०१९ दरम्यान आरसीबीकडून खेळताना एबी डिव्हिलियर्सनेही असाच पराक्रम केला होता.

साई सुदर्शनने यावर्षी अहमदाबादमध्ये पंजाब किंग्जविरुद्ध ७४ धावांची शानदार खेळी केली. यानंतर, त्याने याच मैदानावर मुंबई इंडियन्सविरुद्ध ६३ धावांची शानदार खेळी केली होती. तो आरसीबीविरुद्ध ४९ धावांवर बाद झाला होता, पण हा सामना बंगळुरूमध्ये खेळवण्यात आला. यानंतर, हैदराबादमध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध तो फक्त ५ धावा करू शकला. पण तो पुन्हा अहमदाबादला परतताच त्याने शानदार खेळी केली होती.



अलिबाग : रायगड कबड्डी लीग स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी खासदार सुनील तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी यांनी भेट दिली.

# सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळतो -विराट कोहली



**मुंबई : प्रतिनिधी**

अहंकार बाजूला ठेवून सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळणे हे माझ्या फलंदाजीचे मुख्य तत्त्व आहे, असे म्हणत महान फलंदाज विराट कोहलीने टीकाकरांना प्रत्युत्तर दिले आहे. जिओस्टारला दिलेल्या मुलाखतीत त्याने त्याची भावना व्यक्त केली.

आधुनिक युगातील सर्वात यशस्वी फलंदाजांपैकी एक असलेल्या कोहलीने अलीकडेच आणखी एका विक्रमाला गवसणी घातली. तो टी-२० क्रिकेटमध्ये १३ हजार धावा करणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

गेल्या काही वर्षांत विशेषतः २०२४ टी-२० विश्वचषकापूर्वी ३६ वर्षीय विराटवर टी-२० क्रिकेटमधील त्याच्या स्ट्राइक रेटबाबत अनेकदा टीका झाली. तरीसुद्धा संघ व्यवस्थापनाला त्याच्या क्षमतेबाबत कोणतीही शंका नव्हती आणि त्यांनी त्याला पूर्ण पाठिंबा दिला. विराटने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात द. आफ्रिकेविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली, ज्यामुळे त्याला ‘प्लेयअर ऑफ द मॅच’ म्हणून गौरवण्यात आले.

विराट म्हणाला, माझ्या फलंदाजीमध्ये कधीच अहंकाराला स्थान नाही. माझा उद्देश कधीच कोणावर मात करणे किंवा झाकून टाकणे हा नसतो, तर परिस्थितीनुसार खेळणे आणि सामन्याचा गतीमान प्रवाह कायम ठेवणे हेच माझे मुख्य ध्येय असते. मला या गोष्टीचा नेहमी अभिमान आहे. मी नेहमीच परिस्थितीनुसार खेळू इच्छितो. मी लयीत असतो तेव्हा मी नैसर्गिकरित्या पुढाकार घेतो, पण जर दुसरा फलंदाज अधिक चांगली खेळी करत असेल तर तो पुढाकार घेतो.

## आयसीसी क्रमवारीत शुभमन गिलचे वर्चस्व कायम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीने बुधवारी जाहीर केलेल्या वनडे क्रमवारीत फारसा मोठा बदल झालेला नाही. भारतीय सलामीवीर शुभमन गिल वनडेचा नंबर १ फलंदाज म्हणून कायम आहे. त्याच्या खात्यात ७८४ रेटिंग पॉइंट्स आहेत.

दुसऱ्या क्रमांकावर पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझम आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मा तिसऱ्या आणि विराट कोहली पाचव्या क्रमांकावर आहे. अशा प्रकारे टॉप-५ फलंदाजांमध्ये भारताच्या तीन खेळाडूंचा समावेश आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये शानदार फलंदाजी करणारा श्रेयस अय्यर आठव्या स्थानावर कायम आहे.

गोलंदाजांच्या एकदिवसीय क्रमवारीत श्रीलंकेचा महेश थीकशन पहिल्या क्रमांकावर आहे, तर भारतीय चायनामन फिरकी गोलंदाज कुलदीप यादव दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच्याशिवाय रवींद्र जडेजादेखील टॉप-१० मध्ये आहे. पाकिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत घातक गोलंदाजी करणारा न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज बेन सीयर्सने ६४ स्थानांनी मोठी झेप घेतली आहे. न्यूझीलंडचा खेळाडू मायकेल ब्रेसवेल पाचव्या स्थानावर पोहचला आहे. ब्रेसवेलने पाकिस्तानविरुद्ध झालेल्या मालिकेत उत्तम अष्टपैलू कामगिरी केली होती.

# मी काही बोललो तर वाद होतील!

## ईडन गार्डन्स पिचच्या वादावर अजिंक्य रहाणेचे वक्तव्य

**कोलकाता : वृत्तसंस्था**


कोलकाता नाईट रायडर्सला मंगळवारी लखनऊ सुपर जायंट्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात अवघ्या चार धावांनी पराभव पत्करावा लागला. कर्णधार अजिंक्य रहाणे आणि इतर फलंदाजांनी कडवी झुंज दिली, पण संघ अखेरीस विजय मिळवू शकला नाही. या सामन्यानंतर पत्रकार परिषदेत अजिंक्य रहाणेने ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीच्या वादाबद्दल मोठं वक्तव्य केलं.

आयपीएलमध्ये घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा याबद्दल विचारले असता, कर्णधार अजिंक्य म्हणाला की जर मी काही बोललो तर वाद होतील. कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य पुन्हा एकदा ईडन गार्डन्सच्या




खेळपट्टीबाबत निराश दिसला आणि घरच्या मैदानावर संघाच्या दुसऱ्या पराभवानंतर खेळपट्टी फिरकी गोलंदाजांसाठी अनुकूल नसल्याबद्दल त्याने निराशा व्यक्त केली.

मीडिया रिपोर्ट्सनुसार रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्धच्या केकेआरच्या पहिल्या सामन्यात फिरकी गोलंदाजांसाठी अनुकूल खेळपट्टी तयार करण्याची केकेआरचा कर्णधार रहाणेची विनंती मुखर्जी यांनी नाकारली होती. केकेआरचे प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांनीही म्हटले होते की, घरच्या मैदानाचा फायदा मिळाल्याने कोण आनंदी होणार नाही. गेल्या आठवड्यात हैदराबादविरुद्धच्या सामन्यात रहाणेने खेळपट्टीबाबत समाधानी असल्याचे सांगितले तेव्हा हा प्रश्न सुटल्याचे दिसत असले तरी लखनऊविरुद्धच्या सामन्यानंतर अजिंक्यने दिलेल्या विधानामुळे खळबळ उडाली आहे.

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।




विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

वर्ष २० वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत
माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

दैनंदिन कार्यक्रम

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन

सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
| --- | --- | --- |
| **शुक्रवार** (दि. ११/०४/२०२५) | ह.भ.प. रोशन महाराज (बेलपाडा) | श्री श्री १००८ महामंडलेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज (वहाळ) |
| **शनिवार** (दि. १२/०४/२०२५) | ह.भ.प. गोपिनाथ महाराज (जासई) | ह.भ.प. बाळकृष्ण महाराज गोगावले (सासेवाडी, ता. भोर, जि. पुणे) कै. गिताबाई त्रिंबक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य- श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |
| **रविवार** (दि. १३/०४/२०२५) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | भाषाप्रभू ह.भ.प. रमेश महाराज भोर पाटील (अकोले) कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य -श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **सोमवार** (दि. १४/०४/२०२५) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | ह.भ.प. श्री. भगिरथ महाराज काळे (सिन्नर) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com